cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–४४ | रविवार दि.३ मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### श्वास घेण्याचाही हक्क हिरावणारे प्रदूषण !

निसर्गाने मानवाला दिलेली सर्वात मोठी देणगी म्हणजे शुद्ध हवा. ही हवा कधीकाळी सहज उपलब्ध होती ना त्यासाठी कोणती किंमत मोजावी लागत होती, ना विशेष प्रयत्न करावे लागत होते. पण आजच्या तथाकथित प्रगत आणि आधुनिक युगात हीच हवा हळूहळू मानवाच्या अस्तित्वालाच आव्हान देणारे घातक विष बनत चालली आहे. विज्ञान–तंत्रज्ञानाच्या झपाट्याने वाढलेल्या प्रगतीसोबत आपण निसर्गाशी केलेला अन्याय आता स्पष्टपणे समोर येत आहे.

# कांद्याचे दर कोसळले ; उत्पादन खर्चही निघेना, शेतकरी आर्थिक संकटात

पुणे । प्रतिनिधी

**कांदा काढणीचा हंगाम सध्या जोरात सुरू असला तरी बाजारातील घसरलेल्या दरांमुळे कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. एकेकाळी चांगला भाव देणारे हे पीक आता शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू आणू लागले आहे. काही महिन्यांपूर्वी ज्या कांद्याला प्रतिक्विंटल १५०० ते १८०० रुपये दर मिळत होता, त्याच कांद्याचा भाव सध्या ३०० ते ७०० रुपयांपर्यंत घसरला आहे. या दरात काढणी, मजुरी आणि वाहतुकीचा खर्चही निघत नसल्याने शेतकऱ्यांवर तोट्याचे ओझे वाढत आहे.**

दरात झालेल्या या प्रचंड घसरणीमुळे शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे ठाकले आहे. अनेक शेतकऱ्यांना आपला माल साठवून ठेवण्याची सोय नसल्याने पीक काढताच तातडीने विकावे लागत आहे. परिणामी, बाजारात दर कमी असतानाही त्यांना कांदा विकण्याशिवाय पर्याय राहत नाही. त्यामुळे त्यांच्या हाती काहीच उरत नसून कर्जाचा बोजा मात्र वाढत चालला आहे. दरम्यान, कांदा हा नाशवंत माल असल्यामुळे साठवणूक करणेही मोठे आव्हान ठरत आहे. अनेक शेतकऱ्यांनी शिवारात किंवा घराजवळ भुई ऐरणी करून कांदा साठवून ठेवला आहे. मात्र वाढत्या तापमानामुळे या ऐरणीतील



कांदा सडण्याचा धोका निर्माण झाला आहे. उष्णतेचा वाढता प्रभाव कांद्याच्या गुणवत्तेवर परिणाम करत असून, साठवलेला माल खराब होण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे आधीच कमी दरामुळे अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना आता नुकसान सहन करण्याची भीती अधिक सतावत आहे. यातच बाजारात मागणी कमी झाल्याने परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. व्यापारी मोठ्या प्रमाणावर खरेदीसाठी पुढे येत नसल्याने शेतकऱ्यांना आपला माल विकणे कठीण जात आहे. निर्यात घटणे, बाहेरील बाजारपेठांतील मागणी कमी होणे आणि जागतिक घडामोडींचा परिणाम यामुळे कांद्याच्या व्यापारावर मोठा परिणाम झाल्याचे दिसून येत आहे. आखाती देशांमधील तणावपूर्ण परिस्थितीमुळेही निर्यातीवर परिणाम झाला असून, ग्रामीण अर्थव्यवस्थेला त्याचा फटका बसत ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### तिहेरी हत्याकांड सोलापूर हादरले

सोलापूर : सोलापूर–हैदराबाद महामार्गावर असलेल्या दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी गावात एकाच कुटुंबातील आई आणि तिच्या दोन अल्पवयीन मुलांची तलवारीने वार करून निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी दुपारी उघडकीस आली.आईला वाचवायला गेलेल्या मुलांचाही क्रूरपणे अंत करण्यात आला. संपत्तीच्या वादातून ही हत्या केल्याचा अंदाज वर्तवला जात आहे.या तिहेरी हत्याकांडामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### वैभव सूर्यवंशीला डिवचणं महागात पडलं

मुंबई: शुक्रवारच्या आयपीएल २०२६ च्या सामन्यात, काईल जेमिसनच्या एका अप्रतिम यॉर्करवर सूर्यवंशी अवघ्या ४ धावांवर बाद झाला. मात्र, विकेट घेतल्यानंतर जेमीसनने केलेल्या सेलिब्रेशनवर सोशल मीडियावर टीका झाली. या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने राजस्थान रॉयल्सचा ७ गडी राखून पराभव केला. यानंतर आता बीसीसीआयने या प्रकरणावर आपली प्रतिक्रिया दिली आहे.सवाई मानसिंग स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात राजस्थान रॉयल्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पहिल्याच षटकात यशस्वी जैस्वालने पहिल्या चेंडूवर षटकार मारला. दुसऱ्या षटकात काईल जेमिसनने यशस्वी जैस्वालला बोल्ड केले. त्याआधीच्या चेंडूवर वैभवने समोरून चौकार मारला होता. वैभवला बाद केल्यानंतर काईल जेमिसनने आक्रमकपणे सेलिब्रेशन केले.

### महाराष्ट्रात दर तासाला महिलांवर अत्याचार

पुणे: भोर तालुक्यातील नसरापूर येथील चिमुकलीवर झालेला अत्याचार आणि तिच्या हत्येच्या निर्घृण घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या प्रकरणातील पीडित कुटुंबाची भेट घेण्यासाठी आज आमदार रोहित पवार नसरापूर येथे पोहोचले होते. कुटुंबाचे सांत्वन केल्यानंतर माध्यमांशी बोलताना रोहित पवारांनी राज्यातील बिघडलेल्या कायदा–सुव्यवस्थेर भाष्य केले. राज्यात दर तासाला एका महिलेवर अत्याचार होतोय आणि गुन्हेगारांना पोलिसांचा धाक उरलेला नाही अशा शब्दांत त्यांनी सरकारवर टीका केली आहे. महाराष्ट्रात दिवसाला २४ अत्याचार घडत असून दरवर्षी ५० हजार महिलांवर अत्याचार होत असल्याची भीषण आकडेवारी त्यांनी माध्यमांसमोर मांडली. बीड, बदलापूर आणि बारामतीमधील अलीकडच्या घटनांचा दाखला देत त्यांनी सरकारवर निशाणा साधला.

# कॉपीमुक्त अभियान;पुन्हा मुलींनीच मारली बाजी


## पुणे विभाग बारावी परीक्षेत राज्यात दुसऱ्या क्रमांकावर

पुणे । प्रतिनिधी

**बारावी परीक्षेचा निकाल आज (२ मे) जाहीर करण्यात आला. राज्यातपुणे विभागाचा निकाल ९३. ३४ टक्के लागला असून राज्यात दुसरा क्रमांक पटकावला आहे. बारावी निकालात पुन्हा एकदा कोकण विभागाने बाजी मारली आहे. विद्यार्थ्यांना ७ वेगवेगळ्या वेबसाईटवर आपला निकाल पाहता येणार आहे. यावर्षी राज्याचा एकूण निकाल ९१.८७ टक्के लागला आहे. गेल्या वर्षीच्या ९३.२९ च्या तुलनेत यात १.४२ टक्क्यांची घट झाली आहे.**




राज्यात पुन्हा मुलींची सरशी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मुलींनी बाजी मारली आहे. मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण ९४.७३ टक्के आहे, तर मुलांचे प्रमाण ८९.१४ टक्के आहे. मुली मुलांपेक्षा ५.५९ टक्क्यांनी जास्त उत्तीर्ण झाल्या आहेत. सर्व नऊ विभागीय मंडळांमध्ये कोकण विभाग ९७.५१ टक्के निकालासह प्रथम क्रमांकावर आहे. सर्वात कमी निकाल लातूर विभागाचा लागला आहे. नऊ विभागीय मंडळाचा निकाल,पुणे ९१.२५ ,नागपूर ८८.६७,छत्रपती संभाजीनगर ८८.६८,कोल्हापूर ८९.९७,अमरावती ९०.९२,नाशिक ९०.७२,लातूर ८४.१४,कोकण ९४.१४,मुंबई ९०.०८,शाखानिहाय निकाल विज्ञान शाखा: ९६.४४ टक्के वाणिज्य शाखा: ९२.७१ टक्के,कला शाखा: ८६.४५ टक्के ,व्यावसायिक अभ्यासक्रम ८७.७५ टक्के.,यावर्षी प्रथमच गुणपत्रिका,आणि प्रमाणपत्रनिकाल लागल्यापासून १५ व्या दिवशी एकाच वेळी शाळांमध्ये उपलब्ध करून दिली जातील. सुरक्षा उपाय: पेपर वाहतुकीसाठी एनेबल डिजिटल लॉक सिस्टिमचा यशस्वी वापर करण्यात आला. कॉपीमुक्त अभियान: कडक निर्बंधांमुळे यावर्षी निकालात काही प्रमाणात घट झाली आहे. परीक्षेदरम्यान १९८३ गैरप्रकार आढळले असून १०० कर्मचाऱ्यांवर ▶▶ पान २ वर



# आईनं जीव सोडला, पण त्या माऊली बाळाला सोडले नाही

भोपाळ । प्रतिनिधी

‘आम्ही पाण्याखाली गेलो, तेव्हा पाहिलेलं दृश्य पाहून आम्हाला धक्काच बसला. एक महिला अडकली होती. तिचा हात खेचला असता ती बाहेर येऊ शकत नव्हती. आम्ही नीट पाहिलं, तेव्हा तिच्या हातांमध्ये मूल होतं. तिनं जीव सोडलेला होता. पण तरीही मुलावरची तिची पकड घट्ट होती. ती तिच्या मुलाला सोडत नव्हती,’ हे शब्द आहेत पाणबुड्यांचे, ▶▶ पान २ वर



# पुण्यात २८ लाखाची लाच घेताना महिला अधिकारी पकडली

पुणे । प्रतिनिधी

**शहर पोलीस दलात अत्यंत खळबळजनक घटना समोर आली आहे. पुणे पोलीस आयुक्तालयात एका महिला पोलीस अधिकाऱ्याला २८ लाख रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागानेरंगेहात पकडले आहे. वैशाली तोटेवार असे या महिला सहाय्यक पोलीस निरीक्षकाचे नाव असून, त्या पुणे आर्थिक गुन्हे शाखेत** ▶▶ पान २ वर

# घरगुती गॅस नंतर पेट्रोल–डिझेल दरवाढीची भीती

नवी दिल्ली । वृतसंस्था

**व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या किंमतीनंतर आता पेट्रोल–डिझेल आणि घरगुती गॅस सिलिंडरच्या किंमतीत वाढ होण्याची शक्यता आहे.व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या किंमतीमध्ये ९९३ रूपयांनी वाढ झाल्यानंतर पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतीमध्ये ४ ते ५ रूपयांची वाढ होऊ शकते.असे सांगितले जात आहे.**




जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किंमतीत मोठी वाढ झाली आहे. सध्या कच्च्या तेलाच्या किंमती १२० डॉलरच्या पार झाल्या आहेत. मागील ३ ते ४ महिन्यांपासून कच्च्या तेलाच्या किंमतीत सातत्याने वाढ होत आहे. पण याचा भारतामध्ये पेट्रोल आणि डिझेलच्या दरवाढीवर परिणाम झाला नव्हता. पण आता सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पेट्रोल आणि डिझेलच्या दरात ५ रूपयांपर्यंत वाढ होऊ शकते. तर घरगुती एलपीजी सिलिंडरचे दर ५० रूपयांपर्यंत वाढू शकतात. आखाती देशात इराण–अमेरिका यांच्यातील युद्ध तणावामुळे कच्च्या तेलाच्या किंमतीत वाढ झाली आहे. त्यामुळे एलपीजी गॅस, पेट्रेल आणि डिझेलच्या दरात वाढ केली जाऊ ▶▶ पान २ वर

# भाजपमध्ये गेलेला आपच्या खासदाराने ठोकली धूम

नवी दिल्ली । वृतसंस्था

आम आदमी पक्षाला सोडचिठ्ठी देऊन भारतीय जनता पक्षात सहभागी झालेले राज्यसभेचे खासदार संदीप पाठक यांच्या अडचणी वाढल्या आहेत. त्यांच्या विरोधात पंजाब पोलिसांनी दोन एफआयआर दाखल केल्या आहेत. पाठक यांच्या विरोधात अजामीनपात्र कलमांच्या अंतर्गत गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. त्यामुळे त्यांना अटक होण्याची शक्यता आहे. संदीप पाठक यांनी अवघ्या आठ दिवसांपूर्वीच सत्ताधारी भाजपमध्ये प्रवेश केला आहे.

आपचे चाणक्य मानल्या जाणाऱ्या संदीप पाठक यांनी गेल्या आठवड्यात पक्षाला रामराम केला. त्यांच्यासह एकूण ७ खासदारांनी आपला सोडचिठ्ठी देत भाजपचं कमळ हाती घेतलं. हे सातही खासदार राज्यसभेचे सदस्य आहेत. राज्यसभेतील आपचे १० पैकी ७ सदस्य फुटल्यानं आपला जबर धक्का बसला. त्यापैकी संदीप पाठक आपचे चाणक्य मानले जायचे. आपल्या संघटनेवर त्यांची पकड होती. त्यांच्याच रणनीतीनं पक्ष पंजाबमध्ये २०२२ मध्ये सत्तेत आला. ▶▶ पान २ वर

# विधान परिषदेचे उमेदवार लखपती नव्हे कोट्याधीश

मुंबई । प्रतिनिधी

शिवसेनेकडून पुन्हा उमेदवारी मिळालेल्या नीलम गोऱ्हे आणि शिवसेना उबाठा पक्षाचे उमेदवार अंबादास दानवे यांच्या संपत्तीत गेल्या सहा वर्षांत भरघोस वाढ झाल्याचे दिसून आले आहे. तर, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उमेदवार झिशान सिद्दीकी यांची संपत्ती अवघ्या दोन वर्षांत तब्बल चारपट वाढल्याचे दिसून आले आहे.

विधान परिषदेच्या विद्यमान उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्या संपत्तीत गेल्या सहा वर्षांत दहापट वाढ झाल्याचे दिसून येत आहे. गोऱ्हे यांच्याकडे २०२० मध्ये १.५७ कोटी रुपयांची जंगम मालमत्ता होती तर स्थावर मालमत्तेचे मूल्य सहा कोटी ▶▶ पान २ वर

# चाकणकरांचा पाय खोलात

मुंबई । प्रतिनिधी

भोंदू अशोक खरात मनी लाँडरिंग प्रकरणात ईडीने प्रतिभा चाकणकरआणि त्यांचा मुलगा तन्मय चाकणकर याला समन्स पाठवलं आहे. समता नागरी सहकारी पतसंस्थमध्ये झालेल्या आर्थिक व्यवहाराप्रकरणी प्रतिभा चाकणकर आणि तन्मय चाकणकर यांची चौकशी होणार आहे. प्रतिभा चाकणकर या राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रूपाली चाकणकर ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.२९ एप्रिल २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १३९.०० क्विंटल | २,२५१ | २,५९१ | २,३३६ |
| ज्वारी/हायब्रिड: १२४.५० क्विंटल | १,७५० | ३,९०० | २,४७१ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ८.५० क्विंटल | ७,५०० | ७,५०० | ७,५०० |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: १०३.०० क्विंटल | २,००० | २,४०० | २,२६४ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: २०.०० क्विंटल | ५,६२५ | ५,६२५ | ५,६२५ |
| हरभरा: २१.०० क्विंटल | ५,०७६ | ५,१५७ | ५,११६ |

# आगामी शैक्षणिक वर्षापासून कागपत्रांमध्ये आईचेही नाव

मुंबई । प्रतिनिधी

**राज्याच्या सर्व शाळांमध्ये महत्त्वाचा बदल करण्यात येणार आहे. येत्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांच्या नावात आता आईचं देखील नाव असणं आवश्यक असणार आहे. याआधी विद्यार्थ्याचं नाव, नंतर वडिलांचं नाव आणि मग आडनाव अशा प्रकारची पद्धत होती. पण आता विद्यार्थ्याच्या नावानंतर आईचं नाव, नंतर वडिलांचं नाव आणि त्यानंतर आडनाव अशा पद्धतीने विद्यार्थ्यांच्या नावाची नोंद होईल, असा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय शासकीय, अनुदानित आणि खासगी अशा सर्व शाळांसाठी लागू होणार आहे.**



येत्या शैक्षणिक वर्षापासून तात्काळ प्रभावाने हा निर्णय लागू करण्यात येणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या अधिकृत नोंदींमध्ये वडिलांच्या नावासोबत आणि आईचेदेखील नाव समाविष्ट होणार आहे. याआधी दहावी आणि बारावीच्या गुणपत्रावर आई आणि वडिलांचे नाव लिहिलेलं बघायला मिळालं आहे. पण तिथे आधी आडनाव मग विद्यार्थ्याचे नाव, नंतर वडिलांचे आणि मग आईचे नाव असा क्रम होता. पण या नव्या निर्णयानुसार, आता शाळेतील ओळखपत्रसह सर्व महत्त्वाच्या कागदपत्रांमध्ये विद्यार्थ्यांचं पूर्ण नाव लिहिताना त्यामध्ये दुसऱ्या क्रमांकावर आईचे नाव असणार आहे.राज्य सरकारने असा निर्णय का घेतला असावा? असा प्रश्न अनेकांना पडला असेल. पण हा निर्णय घेण्यामागे खूप चांगला विचार दडलेला आहे. आईच्या योगदानाला सन्मान देणं आणि लिंक समानतेला प्रोत्साहन देणं त्यासोबतच सामाजिक समतोल साधणे हे उद्देश ठेवून संबंधित निर्णय घेण्यात आला आहे. राज्य सरकारच्या या निर्णयानंतर ▶▶ पान २ वर




cmyk

## अग्रलेख

# श्वास घेण्याचाही हक्क हिरावणारे प्रदूषण !

श्वास घेण्याचाही हक्क हिरावणारे प्रदूषण !

निसर्गाने मानवाला दिलेली सर्वात मोठी देणगी म्हणजे शुद्ध हवा. ही हवा कधीकाळी सहज उपलब्ध होती ना त्यासाठी कोणती किंमत मोजावी लागत होती, ना विशेष प्रयत्न करावे लागत होते. पण आजच्या तथाकथित प्रगत आणि आधुनिक युगात हीच हवा हळूहळू मानवाच्या अस्तित्वालाच आव्हान देणारे घातक विष बनत चालली आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या झपाट्याने वाढलेल्या प्रगतीसोबत आपण निसर्गाशी केलेला अन्याय आता स्पष्टपणे समोर येत आहे. आयआयटी दिल्ली आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या ताज्या अहवालाने या धोक्याची गंभीरता पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे.

हा अहवाल केवळ आकडेवारी मांडणारा नाही, तर आपल्या निष्काळजीपणाचा आरसा आहे. ९० च्या दशकात वर्षातील तब्बल ३११ दिवस आपण शुद्ध हवेत श्वास घेत होतो. आज ही संख्या घसरून २३६ दिवसांवर आली आहे. म्हणजेच वर्षातील सुमारे १२९ दिवस आपण प्रदूषित हवेत जगत आहोत. हा केवळ सांख्यिकीय बदल नसून, आपल्या आरोग्याच्या आणि भविष्यातील पिढ्यांच्या अस्तित्वावर आलेले संकट आहे. अहवालातील तीन टप्प्यांचे विश्लेषण पर्यावरणाच्या ऱ्हासाची कहाणी सांगते. १९८७ ते १९९३ या पहिल्या टप्प्यात ८५ टक्के दिवस हवा शुद्ध होती. नंतर १९९४ ते २००८ या काळात जागतिकीकरण, औद्योगिकीकरण आणि नागरीकरणाच्या वाढत्या वेगामुळे प्रदूषणाने आपले पाय रोवायला सुरुवात केली. दिल्ली, आग्रा यांसारख्या शहरांची हवा याच काळात खालावू लागली. तिसऱ्या टप्प्यात, म्हणजे २००९ ते २०२४ दरम्यान, परिस्थिती अधिकच भीषण झाली. आता वर्षातील ३५ टक्के दिवस हवा 'खराब' किंवा 'गंभीर' श्रेणीत मोडते, ही वस्तुस्थिती अंगावर काटा आणणारी आहे. एकेकाळी मोकळ्या हवेसाठी प्रसिद्ध असलेली किनारपट्टीवरील शहरेदेखील आता या प्रदूषणाच्या विळख्यात अडकली आहेत. दिल्ली (६१%), गाझियाबाद (५४%), फरिदाबाद (५२%), नोएडा (४८%) यांसारख्या शहरांनी प्रदूषणाची धोक्याची पातळी ओलांडली आहेच; पण मुंबई (३७%) आणि इंदूर (३४%) सारखी शहरेही मागे नाहीत. वाढत्या वाहनसंख्येमुळे, औद्योगिक धुरामुळे आणि अनियंत्रित नागरीकरणामुळे ही शहरे अक्षरशः 'गॅस चेंबर' बनत आहेत. अहवालातील आणखी एक धक्कादायक बाब म्हणजे सरकारी आकडेवारी आणि प्रत्यक्ष परिस्थिती यामधील तफावत. तज्ज्ञांच्या मते, वास्तवातील प्रदूषणाची पातळी सरकारी आकडेवारीपेक्षा किमान दहा टक्क्यांनी अधिक आहे. म्हणजे आपण जेवढे प्रदूषण समजतो, त्यापेक्षा जास्त विषारी हवा आपण दररोज आपल्या फुफ्फुसात भरत आहोत. ही बाब केवळ चिंता करण्यासारखी नाही, तर तातडीने कृती करण्याची गरज दर्शवणारी आहे. आजवर आपण प्रदूषण मोजण्यापुरतेच मर्यादित राहिलो आहोत; पण आता 'एक्सपोजर वेटेड सिस्टिम' सारख्या पद्धतींचा वापर करून नागरिकांच्या प्रत्यक्ष आरोग्यावर होणाऱ्या परिणामांचे अचूक मोजमाप करणे गरजेचे आहे. मात्र, केवळ मोजमापाच्या पद्धती बदलून उपयोग होणार नाही. यासाठी ठोस आणि कठोर धोरणात्मक बदल आवश्यक आहेत. खासगी वाहनांचा वापर कमी करून सार्वजनिक वाहतुकीला विशेषतः ई-बस, मेट्रोला प्राधान्य देणे अपरिहार्य आहे. औद्योगिक उत्सर्जनावर कडक नियंत्रण, बांधकाम क्षेत्रातील नियमांची काटेकोर अंमलबजावणी, आणि वृक्षलागवड ही केवळ कागदोपत्री न राहता प्रत्यक्षात दिसेल याची खात्री करणे गरजेचे आहे. विकास आणि पर्यावरण यांच्यात समतोल राखणे ही काळाची गरज आहे; अन्यथा विकासाचा हा वेगच विनाशाचे कारण ठरेल. या सर्व प्रक्रियेत सरकार आणि प्रशासनाइतकीच जबाबदारी प्रत्येक नागरिकाचीही आहे. पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे, अनावश्यक वाहनवापर टाळणे, झाडे लावणे आणि त्यांचे संवर्धन करणेया साध्या गोष्टीही मोठा फरक घडवू शकतात. ९० च्या दशकातील ३११ शुद्ध दिवसांचे वैभव आपण गमावले आहे, ही कटू वस्तुस्थिती आहे. पण उरलेले दिवस वाचवणे अजूनही आपल्या हातात आहे. आज आपण जागे झालो, तरच उद्या आपल्या पुढच्या पिढ्यांना शुद्ध हवेत श्वास घेण्याचा अधिकार मिळू शकतो. अन्यथा, भविष्यात 'शुद्ध हवा' ही केवळ पुस्तकात वाचण्यापुरतीच संकल्पना उरेल आणि आपण आपल्या वारसांना देऊ ते फक्त औषधे, मास्क आणि ऑक्सिजन सिलिंडर हा विचारच अंगावर काटा आणणारा आहे.

# क्रोध व अहंकार त्यागल्यासच आनंदी जीवन-ह.भ.प.अशोक महाराज नांगरे

**कवडगाव । प्रतिनिधी**

**तालुक्यातील मोरेवाडी येथील नांगरे वस्तीमध्ये श्री नरसिंह जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराण महाकथेला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. या धार्मिक सोहळ्यात हभप अशोक महाराज नांगरे यांच्या ओजस्वी वाणीतून सुरू असलेल्या शिवपुराण कथेमुळे परिसरात भक्तिमय व आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले आहे.**



कथेदरम्यान मार्गदर्शन करताना महाराजांनी सांगितले की, प्रत्येकाने आपले जीवन आनंदी, शांत व निरामय बनवायचे असेल तर मनातील काम, क्रोध, अहंकार व द्वेष या विकारांचा त्याग करणे अत्यंत आवश्यक आहे. मन शुद्ध, निर्मळ व सकारात्मक ठेवून भगवंताची निष्ठेने सेवा केल्यास त्याची कृपा आणि आशीर्वाद नक्कीच प्राप्त होतात, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. नांगरे वस्ती येथे सुरू असलेल्या या धार्मिक कार्यक्रमात पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत असून हरिनामाच्या गजरात व शिवभक्तीच्या वातावरणात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला आहे. कालच्या कथाप्रसंगी महाराजांनी प्रजापती दक्ष राजा व भगवान शिव,सती माता यांच्या विवाह सोहळ्याचे अत्यंत रसाळ व प्रभावी वर्णन केले. तसेच दक्ष राजाच्या यज्ञात निर्माण झालेली विघ्ने आणि ती कशी दूर झाली याचे सविस्तर विवेचन केले. यावेळी महाराजांनी जीवनातील काही महत्त्वपूर्ण तत्त्वे सांगितली. ज्या ठिकाणी आपल्याला मान-सन्मान मिळत नाही किंवा जिथे आपल्याला निमंत्रण नसते, अशा ठिकाणी जाणे टाळावे. मात्र भजन-कीर्तन, हरिनाम सप्ताह यांसारख्या धार्मिक व सत्संग कार्यक्रमांसाठी निमंत्रणाची वाट न पाहता सहभागी व्हावे, असेही त्यांनी नमूद केले. दक्षयज्ञाच्या प्रसंगाचे वर्णन करताना सती मातेचा झालेला अपमान, त्यातून निर्माण झालेली वेदना व संताप, आणि त्या संतापातून त्यांनी केलेले आत्मबलिदान हा हृदयस्पर्शी प्रसंग महाराजांनी प्रभावीपणे उलगडला. त्यानंतर भगवान शिवशंकर व सती मातेचा विवाह सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न झाला, याचेही वर्णन त्यांनी केले. या धार्मिक कार्यक्रमाला हभप निमट महाराज व गायनसम्राट हभप कागणे महाराज यांची सुरेल साथ लाभत असून, पखवाज वादनाची जबाबदारी हभप अक्षय महाराज इके यांनी समर्थपणे सांभाळली आहे. त्यांच्या वादनामुळे कीर्तन व कथेला अधिक रंगत प्राप्त झाली. कार्यक्रमासाठी कवडगाव, मोरेवाडी तसेच परिसरातील पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी आरती करण्यात येऊन सर्वांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

# मर्चंट बँक सोन लंपास व बनावट प्रकरणी बँक अध्यक्ष जबाबदार

**अंबड । प्रतिनिधी**

अंबड, पोलीस ठाणे येथे अमोल शंकरराव गायकवाड रा. कुक्कडगाव, ता. अंबड, जि. जालना यांनी दिलेल्या तक्रारीवरून मोतीराम अग्रवाल जालना मर्चट को-ऑपरेटिव्ह बँक लि., जालना शाखा अंबड येथील अधिकारी व कर्मचा-याविरुद्ध गंभीर स्वरूपाचा गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. परंतु या प्रकरणी मर्चंट बँकेचे अध्यक्ष गोपाल अग्रवाल हे जबाबदार असल्याचे दिसून येत आहे तसेच गोपाल अग्रवाल यांना सह आरोपी करणे गरजेचे आहे असे बोलले जात . बँकेचे अध्यक्ष अग्रवाल यांना आरोपी केल्यास गरीबाचा सोनं परत मिळू शकते. नियमाप्रमाणे अंबड मर्चंट बँक शाखा अधिकारी यांनी फिर्यादी देणे गरजेचे होते. परंतु त्यांच्यावर दबाव टाकून फिर्याद देऊ नका असे बँके मुख्य शाखा जालना यांच्याकडून अंबड बँक मॅनेजर जाजू यांच्यावर दबाव टाकण्यात येत होता. या प्रकरणी अजून मुख्य आरोपी फरार असल्याचे बोलल्या जात आहे. असे बोलत आहे. फिर्यादी व इतर कर्जदारांनी संबंधित बँकेत सोने तारण ठेवून कर्ज घेतले होते. परंतु बँकेतील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संगनमताने तारण ठेवलेले मूळ सोन्याचे दागिने काढून त्याऐवजी बनावट सोने ठेवून अंदाजे ₹९६,४१,६५०/- किमतीच्या सोन्याची अफरातफर करून फसवणूक केल्याचे निष्पन्न पोलिसांच्या तपासामध्ये झाल्याचे दिसून येत आहे आहे. या प्रकरणात एकूण २० कर्ज खात्यांमधील सुमारे ₹६२,३४,०००/- कर्ज रक्कम व अंदाजे ₹९७,०१,६५०/-किमतीचे सोने संबंधित असल्याचे प्राथमिक तपासात आढळले आहे. सदर गुन्ह्यात आरोपी अंबड शाखा व्यवस्थापक,सोमनाथ मनोहर नसवाले (शिपाई) ,अंगद गणेश येवले (कॅशीयर) यांना अटक करण्यात आलेली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींना मा. न्यायालयासमोर हजर करण्यात आले असून त्यांना दिनांक ०५/०५/२०२६ रोजीपावेतो पोलीस कोठडी सुनावण्यात आलेली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास मा. पोलीस अधीक्षक, जालना, अप्पर पोलीस अधीक्षक व उपविभागीय पोलिस अधिकारी, उपविभाग अंबड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष घोडके व त्यांची टीम करीत आहे. तसेच या प्रकरणातील इतर सहभागी आरोपींचा शोध घेणे व कर्जदारांचे गायब झालेले सोने शोधून काढणे याबाबत सखोल तपास सुरू आहे. अंबड पोलीस नागरिकांना आवाहन करीत आहेत की, सदरच्या बँकेकडुन ज्या ठेवीदारांची या प्रकारे फसवणुक झाली आहे अशा ठेवीदारांनी तसेच संबंधित प्रकरणाबाबत कोणाकडेही माहिती असल्यास त्यांनी पुढे येऊन पोलिसांना माहिती देवुन सहकार्य करावे.

# आठ दिवसांत नागझरीमानेचावाडा रस्त्याचे काम सुरू होईल-आ. संदीप क्षीरसागर

## महंत शिवाजी महाराजांच्या हस्ते रस्ता कामाचा नारळ फोडून शुभारंभ!

**बीड । प्रतिनिधी**

**नागझरीमानेचावाडा येथील दीड किलोमीटर लांबीचा अत्यंत खराब व अरुंद रस्ता लवकरच रुंद व पक्का रस्ता करून देत असल्याची आनंददायी घोषणा आमदार संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. श्री क्षेत्र नारायण गडाचे महंत प्रेममूर्ती शिवाजी महाराज यांच्या सूचनेला सकारात्मक प्रतिसाद देत, "आठ दिवसांत पक्का रस्ता कामाचा शुभारंभ करू," असे ठाम आश्वासन त्यांनी दिले.**



श्री क्षेत्र नारायण गडाच्या मानेचावाडानागझरी येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता प्रसंगी महंत शिवाजी महाराज, आ. संदीप क्षीरसागर आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के हे एकत्र आले होते. यावेळी महंत शिवाजी महाराजांनी ग्रामस्थांच्या रस्ता गैरसोयीची जाणीव करून देत, या रस्त्याची तातडीने सुधारणा व्हावी, अशी इच्छा व्यक्त केली. महाराजांच्या या शब्दाला तात्काळ प्रतिसाद देत आ. क्षीरसागर यांनी आठ दिवसात पक्का रस्ता कामाची सुरुवात होईल. रस्ता रुंद व सुव्यवस्थित करून दिला जाईल.अशी घोषणा केली. आणि महाराजांच्या हस्ते रस्ता कामाचा नारळ फोडून शुभारंभ करण्यात आला. उल्लेखनीय म्हणजे, मागील अतिवृष्टीमुळे हा रस्ता अत्यंत खराब झाला होता. यामुळे ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या समस्येच्या निराकरणा साठी ग्रामस्थांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. आज अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने साधलेला हा योग ग्रामस्थांसाठी दिलासादायक ठरला. महंत शिवाजी महाराजांनी व्यक्त केलेली खंत लक्षात घेऊन आ. संदीप क्षीरसागर यांनी तत्परतेने निर्णय घेत नागझरीमानेचावाडा रस्त्याचा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी आभार व्यक्त केले. या निर्णयामुळे ग्रामस्थांमध्ये समाधान आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



# माजी आ. सुरेशकुमार जेथलिया अनंतात विलीन

**परतूर । प्रतिनिधी**

परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार, विकासाचा चेहरा आणि जनसामान्यांचे आधारस्तंभ सुरेशकुमार जेथलिया यांच्या पार्थिवावर आज सकाळी परतूर इथल्या विठ्ठल जिनिंग परिसरात अंत्यसंस्कार करण्यात आले. ६९ वर्षीय जेथलिया यांचं काल हृदयविकारांन निधन झालं होत. त्यांच्या पश्चात पत्नी माजी नगराध्यक्षा विमलताई जेथलिया, तीन मुले, सुना, नातवंडे आणि भाऊ असा मोठा परिवार आहे. अंत्यसंस्कार प्रसंगी खा. कल्याण काळे, खा. संजय जाधव, खा. रवींद्र चव्हाण, माजी खा. चंद्रकांत खैरे, माजी खा. गणेशराव दूधगावकर, आ. अर्जुनराव खोतकर, आ. बबनराव लोणीकर, आ. राजेश विटेकर, आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, आ. मोहन कायंदे, आ. हिकमत उढाण, माजी आ. कैलास गोरंट्याल, विजय भांबळे, जयप्रकाश दांडेगावकर, आणि माहेश्वरी समाजाचे प्रदेशाध्यक्ष मधुसूदन गांधी यांच्यासह हजारो कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

# पुण्यात चार वर्षांच्या चिमुकलीसोबत नको ते कृत्य

## सुनेत्राताईंचा सीएम याना तर फडणवीस यांनी एसपींना फोन फिरवला

**पुणे। प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर गावात चार वर्षाच्या चिमुकलीवर एका नराधमाने लैंगिक अत्याचार करून तिची निर्घृणपणे हत्या कर केल्यानंतर राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे. आज उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांनी घटनास्थळी जाऊन सांत्वन करत थेट सीएम याना फोन लावला या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची गंभीर दाखल घेतली आहे. पुणे ग्रामीण पोलिस अधीक्षकांना फोन करुन या प्रकरणात कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.**

काल रात्री या लहान मुलीचा मृतदेह पोलीस ठाण्यासमोर नेऊन स्थानिक नागरिकांनी रास्ता रोको आंदोलन केले होते. पुण्याचे एसपी संदीप सिंग गिल यांनी या सगळयांची समजूत काढून आंदोलकांना माघारी पाठवले होते. मात्र, शनिवार सकाळी नसरापूरमधील सुपर बाजार चौकात ग्रामस्थांनी पुन्हा ठिय्या आंदोलन सुरु केले. जोपर्यंत पोलीस अधीक्षक आणि तहसीलदार येत नाही तोपर्यंत आम्ही चर्चा करत नाही, अशी भूमिका या ग्रामस्थांनी घेतली. यावेळी पोलीस आणि ग्रामस्थांमध्ये बाचाबाची झाली. त्यामुळे सध्या नरसापूर परिसरात वातावरण तापले आहे. स्थानिक आमदार शंकर मांडेकर हेदेखील आंदोलनस्थळी पोहोचले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्याशीही फोनवरुन चर्चा केल्याचे समजते. पुणे जिल्ह्यातील घटना ही अत्यंत निंदनीय, दु:खद घटना आहे. साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर ६५ वर्षांच्या नराधमाने अत्याचार केला आणि तिचा खून केला. आरोपीला अटक झाली आहे. आरोपीचे अशाप्रकारचे जुने संदर्भही दिसत आहेत. एकूणच या घटनेमुळे समाजात मोठा रोष आहे. सगळ्यांनाच मुलीबद्दल आणि त्यांच्या कुटुंबाबद्दल प्रचंड हळहळ वाटते. आरोपीला अटक झाली आहे. पण मी आश्वस्त करु इच्छितो की, फास्ट ट्रॅक कोर्टात आम्ही हे प्रकरण नेऊ. आम्ही हायकोर्टाला विनंती करु, विशेष सरकारी वकील देऊन या नराधमाला मृत्यूदंडाची शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी आम्ही करणार आहोत. मला वाटतं हा असंवेदनशीलपणा आहे. प्रत्येक गोष्टीत राजकारण शोधून काढणं, यापेक्षा दुसरं काही वाईट असू शकत नाही. काही गोष्टींबाबत संवेदना बाळगली पाहिजे. राज्य सरकार जे करायला पाहिजे, ते करत आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना म्हटले.

## पान १ वरून...

### कांद्याचे दर कोसळले ; उत्पादन

आहे. एकीकडे दर कोसळलेले आहेत, तर दुसरीकडे वातावरणही कांद्याला पोषक नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची अवस्था 'इकडे आड, तिकडे विहीर' अशी झाली आहे. या परिस्थितीत कांदा हे पीक शेतकऱ्यांसाठी फायदेशीर राहिलेले नसून, भविष्यात या पिकाकडे शेतकरी पाठ फिरवण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्याच्या परिस्थितीत कांदा उत्पादक शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्याची गरज आहे. बाजारभाव स्थिर ठेवण्यासाठी आणि शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळण्यासाठी सरकारने हस्तक्षेप करून ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. अन्यथा, कांद्याच्या या दरघसरणीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडण्याची भीती व्यक्त होत आहे.

----------

### आईनं जीव सोडला, पण त्या

ज्यांनी मध्य प्रदेशच्या जबलपूरमध्ये क्रुझ बुडाल्यानंतर मदत आणि बचाव कार्य राबवलं. जबलपूरमध्ये धरणात फिरायला गेलेल्या पर्यटकांची क्रूझ बोट ३० एप्रिल रोजी उलटली. या अपघातात ९ जणांचा मृत्यू झाला. तर २२ जणांना वाचण्यात यश आलं. बोटीला अपघात होताच पाणबुड्यांना पाचारण करण्यात आलं. त्यावेळच्या परिस्थितीची माहिती बचाव पथकातील एका कर्मचाऱ्यानं दिली. 'पाण्यात शिरुन काम करणं कठीण असतं. क्रूझ बोट पूर्णपणे उलटली होती. पाण्याच्या आत दृश्यमानता खूप कमी होती. अस्पष्ट दिसत असल्यानं बचाव कार्यात अडचणी येत होत्या,' अशा शब्दांत बचाव पथकातील एका कर्मचाऱ्यानं आव्हानात्मक परिस्थितीबद्दल सविस्तर माहिती दिली.'तिथे जागा अतिशय कमी होती. लोखंडाचे टोकदार खिळे होते. त्यामुळे आम्हाला हातोड्यांचा वापर करुन अरुंद मार्ग तयार करावे लागले. त्यावेळी एक पाणबुडा त्यातच अडकला,' अशी माहिती बचाव कार्यात सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांनी दिली.

-----------

### कॉपीमुक्त अभियान;पुन्हा

निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. सवलतीचे गुण: खेळाडू, स्काऊट आणि गाईड विद्यार्थ्यांना शासन निर्णयानुसार सवलतीचे गुण देण्यात आले आहेत. पुरवणी परीक्षा: जे विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहेत त्यांच्यासाठी जून-जुलै २०२६ मध्ये पुरवणी परीक्षा घेतली जाईल.

--------------

### भाजपमध्ये गेलेला आपच्या

खासदार संदीप पाठक यांच्या अटकेसाठी पंजाबचे पोलीस त्यांच्या दिल्लीतील घरी पोहोचले होते. पंजाब पोलिसांनी सकाळच्या सुमारास पाठक यांचं दिल्लीतील सरकारी निवासस्थान गाठलं. पोलिसांच्या अटकेपासून स्वत:चा बचाव करण्यासाठी पाठक यांनी त्यांच्या सरकारी निवासस्थानच्या मागच्या बाजूनं पळ काढला. पांढऱ्या रंगाच्या कारमध्ये बसून ते निघून गेले. या दरम्यान हाय व्होल्टेज ड्रामा पाहायला मिळाला. पाठक कारमधून बसून निवासस्थानातून जात असतानाच व्हिडीओ समोर आला आहे.आपल्या विरोधात दाखल झालेल्या एफआयआरची कोणतीही कल्पना नसल्याचं खासदार संदीप पाठक यांनी सांगितलं.

----------

### घरगुती गॅस नंतर पेट्रोल-

शकते. तेल कंपन्या आणि सरकारी तिजोरीवरील भार कमी करण्यासाठी सरकारने इंधनाच्या दरात वाढ करण्याचा विचार केला आहे.गुरूवारी ब्रेंट क्रूड तेलाच्या किंमती १२६ रूपयांवर पोहचल्या होत्या. मार्च २०२२ नंतर ही सर्वोच्च किंमत आहे. गेल्या काही दिवसांत सरकार आणि तेल कंपन्यांना मोठा तोटा सहन करावा लागत आहे. त्यामुळे इंधनाचे दर वाढवण्याचा सरकार विचार करत आहे. गेल्या ६० दिवसांपासून होर्मुझची सामुद्रधुनी बंद असल्याने कच्च्या तेलाच्या आयातीच्या खर्चात मोठी वाढ झाली आहे. जगभरातील अनेक देशांमध्ये पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढल्या आहेत. तरीही भारतात दर स्थिर आहेत.मात्र आता इंधन दरवाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही अनेक ठिकाणी डिझेल पेट्रोल पंपावर वाहनाच्या रांगा दिसत असल्याने दरवाढीची चाहूल लागत आहे.

-------------

### पुण्यात २८ लाखाची लाच

कार्यरत होत्या. थेट पोलीस आयुक्तालयाच्या परिसरात ही कारवाई झाल्याने पोलीस दलात एकच खळबळ उडाली आहे. वैशाली तोटेवार यांची नुकतीच लोहमार्ग (रेल्वे) पोलीस मुंबई येथे बदली झाली होती. इतकेच नव्हे तर त्यांना पुणे शहर पोलीस दलातून कार्यमुक्तदेखील करण्यात आले होते. मात्र, बदली होऊनही आणि पदभार सोडलेला असतानाही त्यांनी २८ लाखांची मोठी रक्कम स्वीकारण्याचे धाडस केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.आर्थिक गुन्हे शाखेच्या एका प्रकरणाच्या तपासा दरम्यान एकूण ३० लाख रुपयांची मागणी झाली होती. त्यापैकी २ लाख रुपये आधी स्वीकारण्यात आले होते. त्यानंतर पुन्हा २८ लाख रुपयांची मागणी करण्यात आली. एका खाजगी व्यक्तीच्या माध्यमातून वैशाली तोटेवार या लाचेची रक्कम स्वीकारत होत्या. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून तोटेवार आणि त्या खाजगी व्यक्तीला २८ लाखांची लाच स्वीकारताना ताब्यात घेतले. या प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

--------------------

### चाकणकरांचा पाय खोलात

यांच्या बहीण आहेत. अशोक खरात प्रकरणात ७० कोटी रूपयांच्या घोस्ट अकाऊंटचा भांडाफोड झाला आहे. खरात प्रकरणात ईडीच्या तपासाला आता वेग आला असून प्रतिभा आणि तन्मय चाकणकर या दोघांनाही पुढील आठवड्यात चौकशीसाठी बोलावलं आहे. समता नागरी सहकारी पतसंस्थेत चार खात्यांतून गेल्या काही वर्षात १ कोटी २० रूपये ते २ कोटी ४० लाख रूपयांचे आर्थिक व्यवहार झाले आहेत. हे सर्व बँक अकाऊंट्स अशोक खरातशी संबंधित होते. १३४ हून अधिक प्रॉक्सी अकाऊंट्स खरात चालवत होता असा आरोप आहे. या सर्व खात्यांचा नॉमिनी खरात होता. ही सगळी खाती उघडताना एकाच मोबाईल नंबरचा वापर करण्यात आला होता. मात्र हे सर्व अकाऊंट्स बोगस असल्याचं आणि त्यांची खोटी सही सादर करून हे अकाऊंट्स सुरू करण्यात आलेत असं स्पष्टीकरण याआधीच प्रतिभा चाकणकर यांनी दिलं आहे. प्रतिभा चाकणकर यांनी या सर्व आरोपांचे खंडन करत संबंधित खाती पूर्णपणे बनावट असल्याचा दावा केला आहे. त्यांना कोणतीही माहिती न देता, बनावट स्वाक्षऱ्यांचा वापर करून ही खाती उघडण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे.७० कोटींचा संशयित आर्थिक घोटाळा तपासात २०२२ ते २०२४ दरम्यान ७० कोटी रुपयांहून अधिक संशयित व्यवहार आढळले आहेत. अशोक खरातने धार्मिक कार्यांच्या नावाखाली लोकांकडून आधार आणि पॅनसारखी कागदपत्रे गोळा करून त्यांचा गैरवापर केल्याचा आरोप आहे. या कागदपत्रांच्या आधारे अनेक 'बेनामी' आणि 'घोस्ट' अकाउंट्स उघडण्यात आले, ज्यांचा वापर पैशांची लेयरिंग करण्यासाठी करण्यात आला.

--------------

### विधान परिषदेचे उमेदवार

रुपयांच्या घरात होते. गुरुवारी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार, त्यांच्या जंगम मालमत्ता ११.६६ कोटी रुपये झाली आहे. त्यांनी स्थावर मालमत्तेत ७.६९ कोटी रुपयांची स्वअर्जित तर १२.७६ कोटी रुपयांची वडिलोपार्जित मालमत्ता जाहीर केली आहे. गोऱ्हे यांच्याकडे टोयोटा इनोव्हा हायक्रॉस ही ३४.६९ लाख किंमतीची गाडीही आहे.अंबादास दानवे यांना शिवसेना उबाठा पक्षाने पुन्हा उमेदवारी दिली असून त्यांच्या संपत्तीतही भरघोस वाढ झाल्याचे दिसून आले आहे. २०१९ मध्ये दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार दानवे, त्यांची पत्नी अनुराधा आणि अवलंबित व्यक्तींमध्ये पत्नी प्रिया आणि हिंदू अविभक्त कुटुंब असे मिळून ६३.७८ लाख रुपयांची जंगम संपत्ती होती. तर, ४६.२४ लाख रुपये किंमतीची स्थावर मालमत्ता होती.पत्नी अनुराधा यांच्या नावे १३.९४ लाख रुपयांचे कर्ज होते. गुरुवारी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार, दानवे यांच्या कुटुंबीयांची मिळून २.३६ कोटी रुपयांची जंगम संपत्ती तर पाच कोटी सहा लाख रुपये किंमतीची स्थावर मालमत्ता आहे. कुटुंबातील सर्व व्यक्तींचे मिळून एकूण ८.९६ कोटी रुपयांचे कर्ज आहे. अनुराधा यांच्या नावावर एक मर्सिडीज बेन्झ गाडीही आहे.झिशान सिद्दीकी यांनी २०२४ मध्ये विधानसभा निवडणूक लढविताना ५.२० कोटी रुपयांची जंगम मालमत्ता व ३१.६९ कोटी रुपयांची स्थावर मालमत्ता जाहीर केले होते.सिद्दीकी यांनी २१.१७ कोटी रुपयांची जंगम मालमत्ता जाहीर केली असून स्थावर मालमत्तेत मात्र काहीशी घट होऊन २८.७४ कोटी रुपयांची मालमत्ता नावावर असल्याचे स्पष्ट केले आहे.

----------

### आगामी शैक्षणिक वर्षांपासून

विद्यार्थ्यांचे हजेरीपत्रक, गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला तसेच प्रवेश निर्गम उतारा सर्व कागदपत्रांवर विद्यार्थ्यांच्या नावानंतर आईचे नाव वडिलांच्या आधी नमूद केले जाणार आहे.दरम्यान, असं असलं तरी घटस्फोटीत किंवा विभक्त राहणाऱ्या पालकांच्या नावासोबत कुणाचं नाव लिहायचं? याबाबत परिस्थितीननुरुप योग्य ती नोंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती समोर येत आहे. याबाबत आणखी काही निर्णय घेतला जातो का किंवा काही नवीन अपडेट येतं का? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

------------

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

रविवार, दि. ०३ मे २०२६



## थोडक्यात



माजलगाव :– येथे भोसले व कदम यांच्या विवाह सोहळ्यानिमित पाथरी विधानसभा मतदार संघाचे आमदार राजेश दादा विटेकर हे आले असता त्यांचा सत्कार करताना दादा मनुरकर,संतोष कर्डिले,उल्हास कदम,तुकाराम कदम,अंगद गोपाळ

### बाजार समिती कार्यालयात उपसभापती श्रीहरी मोरे यांच्या हस्ते ध्वजारोहण

माजलगाव । प्रतिनिधी

येथील बाजार समिती कार्यालयात महाराष्ट्र दिनानिमित्त आज दि.०१ मे शुक्रवार रोजी उत्साहपूर्ण वातावरणात ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला.बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी मोरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



यावेळी सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे,संचालक संजय कचरे,कदीर पठाण,अमोल जाधव,नंदकिशोर सजगणे,माजी पंचायत समिती सदस्य मिलिंद लगाडे,सचिव हरिभाऊ सवणे, सह सचिव रविंद्र नाईकनवरे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी राष्ट्रध्वजाला सलामी देत देशभक्तीपर घोषणा दिल्या. कार्यक्रमास बाजार समितीचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### किर्ती गव्हाणेचे राज्यस्तरीय ऋणानुबंध टॅलेंट सर्च परीक्षेमध्ये घवघवीत यश

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथे असणाऱ्या येडेश्वरी इंग्लिश स्कुलची विद्यार्थ्यींनी कु.किर्ती नामदेव गव्हाणे हिने स्पर्धा परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन करीत जिल्हास्तरावर तृतीय क्रमांक मिळवला आहे.



मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या ऋणानुबंध टॅलेंट सर्च परीक्षेमध्ये येडेश्वरी इंग्लिश स्कूलची इयत्ता पहिलीची विद्यार्थ्यांनी कु.किर्ती नामदेव गव्हाणे हिने घवघवीत यश संपादन करून जिल्ह्यातुन तृतीय क्रमांक पटकावत ग्रामीण भागातील विद्यार्थी ही कुठल्याही स्पर्धा परीक्षेत मागे नाहीत हे दाखवुन दिले आहे.त्याच बरोबर तिच्या सोबत येडेश्वरी इंग्लिश स्कूलचे एकूण २३ विद्यार्थी या परीक्षेसाठी प्रविष्ट झाले होते त्यापैकी आठ विद्यार्थी तालुकास्तरावर व जिल्हास्तरावर वेगवेगळ्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेली आहेत त्याचबरोबर एकूण दहा विद्यार्थी तालुकास्तरावर व जिल्हा स्तरावर विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेली आहेत.त्याचबरोबर इतर एकूण दहा विद्यार्थी तालुकास्तरीय गुणवंत ठरले आहेत

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे वेगवेगळ्या सामाजिक स्तरामधून तोंड भरून कौतुक केले जात आहे व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.येडेश्वरी इंग्लिश स्कूलचे प्राचार्य श्री ओम प्रकाश खंडेलवाल यांनी विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

# आष्टीचा मान वाढवणारा 'खाकी हिरो'

## बजरंग बनसोडे यांना 'महासंचालक सन्मानचिन्ह' ; मुंबई पोलीस आयुक्तांच्या हस्ते गौरव

आष्टी । प्रतिनिधी

ग्रामीण मातीतून उभा राहून कर्तृत्वाच्या बळावर महानगरात लौकिक मिळवणाऱ्या आष्टीच्या सुपुत्राने पुन्हा एकदा तालुक्याचा मान उंचावला आहे. मुंबई पोलीस दलात पोलीस उपायुक्त (गुन्हे प्रतिबंधक) म्हणून कार्यरत असलेले बजरंग आनंदराव बनसोडे यांना महाराष्ट्र दिनाच्या पार्श्वभूमीवर 'पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह २०२५' या मानाच्या सन्मानाने गौरविण्यात आले. मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती यांच्या हस्ते हा सोहळा दिमाखात पार पडला.

शिक्षक ते 'डीसीपी' : जिद्दीचा थक्क करणारा प्रवास

ग्रामीण कुटुंबात जन्मलेल्या बनसोडे यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात शिक्षक म्हणून केली. मात्र, खाकी वर्दीची ओढ आणि प्रशासनात काम करण्याची जिद्द त्यांना सतत पुढे नेत राहिली. नोकरी सांभाळत त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी केली आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षेत घवघवीत यश मिळवत पोलीस दलात अधिकारी म्हणून प्रवेश केला. हा प्रवास केवळ करिअर बदलाचा नव्हे, तर जिद्द, संयम आणि ध्येयवेडेपणाचा आदर्श ठरला आहे.

गुन्हेगारीवर 'कडक' नियंत्रण; १५६ प्रशस्तीपत्रांची कमाई

मुंबईसारख्या धकाधकीच्या शहरात गुन्हे प्रतिबंधक विभागात काम करताना बनसोडे यांनी गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण मिळवले. त्यांच्या धाडसी निर्णयांमुळे आणि काटेकोर अंमलबजावणीमुळे अनेक गुन्हे उघडकीस आले.पोलीस सेवेत त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत त्यांना आजवर तब्बल १५६ प्रशस्तीपत्रे बहाल करण्यात आली आहेत. त्यांच्या कार्यशैलीत शिस्त, पारदर्शकता आणि परिणामकारकता यांचा संगम दिसून येतो.



तपासकौशल्याची 'धार'; ८ प्रकरणांत जन्मठेप

बनसोडे हे केवळ प्रशासकीय अधिकारी नसून कुशल तपास अधिकारी म्हणूनही ओळखले जातात. त्यांनी हाताळलेल्या किंवा पर्यवेक्षण केलेल्या ८ गंभीर प्रकरणांमध्ये न्यायालयाने आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

त्यांच्या तपासाचा दर्जा, पुराव्यांची मांडणी आणि न्यायालयीन प्रक्रियेतील भक्कम बाजू यामुळे त्यांचे नाव विश्वासार्ह अधिकाऱ्यांमध्ये घेतले जाते.

"NIA'मध्ये कामगिरी; ३२ दहशतवाद्यांना अटक

त्यांच्या कार्यकुशलतेची दखल घेत केंद्र सरकारने त्यांची निवड राष्ट्रीय तपास संस्था (छख-) मध्ये प्रतिनियुक्तीवर केली. जून २०२२ ते जून २०२५ या कालावधीत त्यांनी देशविघातक कारवायांवर कठोर कारवाई करत ३२ दहशतवाद्यांना जेरबंद केले व त्यांच्याविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले.

आयएसआयएससारख्या दहशतवादी संघटनांविरुद्धच्या विशेष मोहिमेत त्यांच्या योगदानासाठी त्यांना 'केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक २०२४' देऊन गौरविण्यात आले.

तरुणांसाठी प्रेरणादायी 'दीपस्तंभ'

बनसोडे यांच्या यशामुळे बीड जिल्ह्यासह आष्टी तालुक्यात अभिमानाचे वातावरण आहे. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या ग्रामीण भागातील तरुणांसाठी त्यांचा प्रवास दिशादर्शक ठरत आहे.



कष्ट, चिकाटी आणि ध्येय स्पष्ट असेल, तर कोणतीही उंची गाठता येते, हा संदेश त्यांनी आपल्या कर्तृत्वातून दिला आहे.

सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव

या गौरव सोहळ्यावेळी पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी व कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते. बनसोडे यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, आष्टी तालुक्यासाठी हा अभिमानाचा क्षण ठरला आहे.

## नाथ कनिष्ठ महाविद्यालय नाथापुर चे बारावी परीक्षेत घवघवीत यश





नाथापुर । प्रतिनिधी

ग्रामीण विकास महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, नाथापुर संचलित नाथ कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी फेब्रुवारी/मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत यशाची परंपरा कायम राखली आहे.

विज्ञान शाखेतून एकूण २३३ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ४३ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले असून १८५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. विज्ञान शाखेचा एकूण निकाल १०० टक्के लागला आहे. यामध्ये चि. राखुंडे गौरव बप्पासाहेब हा ८४.६७ टक्के मिळवून नाथापुर केंद्रात सर्वप्रथम, कु. पठाण शिफा दिलावरखान ही ८३.५० टक्के मिळवून केंद्रातून सर्वद्वितीय तर चि. गिरी वैभव विशाल हा ८२.८३ टक्के मिळवून केंद्रातून सर्वतृतीय आला आहे.

कला शाखेतून एकूण १०३ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ९८ विद्यार्थ्यांनी चांगले यश संपादन केले आहे. कला शाखेचा निकाल ९४.८४ टक्के लागला आहे. या शाखेत कु. भोकरे सुनिता प्रल्हाद ही ८३ टक्के मिळवून सर्वप्रथम, चि. अवघड अविनाश आसाराम हा ७५.३३ टक्के मिळवून सर्वद्वितीय तर कु. टेकाळे सरिता वैजनाथ ही ७३.६७ टक्के मिळवून सर्वतृतीय आली आहे.महाविद्यालयाचा एकूण निकाल ९८.४४ टक्के लागल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक मा. मदनरावजी चव्हाण (मा. जि. प. सदस्य, पिंपळनेर), नाथापुरच्या सरपंच सौ. मयुरी सुंदर चव्हाण, उपसरपंच श्री सतीश बापू शिंदे, मा. सुंदर भैया चव्हाण (जिल्हा उपाध्यक्ष, भा. ज. पा.), प्रगतीशील शेतकरी श्री संजय चव्हाण, अंकुश जिजा चव्हाण, सतीश रांदड, नाथ कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य गोविंद चव्हाण, साईनाथ मतीमंद विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक चव्हाण, नाथ हायस्कूलचे मुख्याध्यापक साळवे सर, जि. प. शाळेचे मुख्याध्यापक व केंद्रप्रमुख गोविंद सारडा सर,पत्रकार गंगाधर गिराम सर, कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व शिक्षकवृंद तसेच गावातील सर्व नागरिकांनी अभिनंदन केले आहे. या यशाबद्दल संस्थेच्या वतीने शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे.

## पान ६ वरुन...

### गेवराईत विजेचा

दाद मागायची कोणाकडे, असा प्रश्न सामान्य जनतेला पडला आहे.व्यावसायिकांचे कंबरडे मोडलेवारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे आईस्क्रीम पार्लर, शीतपेय विक्रेते आणि लग्नसराईमुळे कामाचा व्याप असलेल्या टेलरिंग व्यावसायिकांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. कामाच्या वेळी वीज नसल्याने अनेकांचे रोजगार संकटात आले आहेत.आंदोलनाचा इशारामहावितरणने या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन शहराचा वीजपुरवठा सुरळीत करावा. जर ही परिस्थिती सुधारली नाही, तर माजी नगरसेवक सय्यद एजाज यांच्या नेतृत्वाखाली त्रस्त नागरिक महावितरण कार्यालयावर धडक देतील, असा इशारा यावेळी देण्यात आला आहे.

### ग्रामीण भागातील शेतीला

तालुक्यात गेल्या १८ वर्षांपासून सातत्याने आयोजित करण्यात येणाऱ्या या कृषी प्रदर्शनामुळे शेतकऱ्यांच्या शेतीत सकारात्मक बदल घडून आले आहेत, आता बीडमध्येही हे प्रदर्शन यांनी आयोजित केल्यामुळे नक्कीच बीड तालुक्यातील शेतकऱ्यांनाही नवी दिशा मिळेल असे सांगून ते पुढे म्हणाले की, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली असून या माध्यमातून शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळून त्यांचे उत्पादन व उत्पन्न निश्चितच वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, या भव्य व शिस्तबद्ध कृषी प्रदर्शनाच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल त्यांनी कृषिभूषण महेश बेदरे यांचे तोंडभरून कौतुक केले.

या कृषी प्रदर्शनाच्या पहिल्या वर्षापासून आजपर्यंतचे १८ वर्षांचे यशस्वी प्रवासाचे आपण साक्षीदार आहोत. या प्रदर्शनामुळे गेवराई तालुक्यासह आता बीड परिसरातील शेतकऱ्यांना मोठा फायदा होत असून येणाऱ्या काळातही शेतकऱ्यांसाठी हे प्रदर्शन दिशादर्शक ठरेल, असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेश बेदरे यांनी केले, प्राध्यापक जगता यांनी केले तर रकटे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### पाटोदा घरफोडीचा छडा

माहितीच्या आधारे २९ एप्रिल २०२६ रोजी दुपारी खोकरमोहा शिवारात माळरानावर असलेल्या पालावर छापा टाकून पोलिसांनी यश चव्हाण (वय ३८ वर्ष) याला ताब्यात घेतले. पोलिसांनी आरोपीकडून गुन्ह्यातील १६,१५० रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने जप्त केले आहेत. आरोपी आणि जप्त केलेला मुद्देमाल पुढील तपासासाठी पाटोदा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात पोउपनि श्रीराम खटावकर, अंमलदार आनंद मस्के, बाळु सानप, विकास राठोड, अशोक दुबाले, स्वाती मुंडे, बबन सलगर, मनोज परजणे आणि चालक सिध्देश्वर मांजरे यांचा समावेश होता.

### महानुभाव पंथाची समता व

आणि भक्तांच्या सोयीसाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त केला.राज्य शासनाकडून महानुभव पंथ व श्री चक्रधर स्वामी मंदिर विकासासाठी मोठा निधी मंजूर झाल्याने भविष्यात पाटोदा शहराला धार्मिक व सांस्कृतिक वैभव प्राप्त होईल असा विश्वास आ.धस यांनी व्यक्त केला. यावेळी कविश्वर कुलाचार्य मंहत श्री कारंजेकर बाबा यांनीही कौतुक करून मार्गदर्शन केले.या कार्यक्रमास कविश्वर कुलाचार्य मंहत श्री कारंजेकर बाबा,आचार्य श्री दर्यापूरकर बाबा,आचार्य श्री कापुसतळणीकर बाबा,रामकृष्ण बांगर,सय्यद आबुशेट,महेंद्र गर्जे,तात्यासाहेब हुले,केशव रसाळ,भाऊसाहेब भवर,किरण बांगर,बळीराम पोटे,सोमीनाथ कोल्हे,राजेंद्र जाधव,किरण शिंदे,भागवत येवले,जब्बार पठाण,रामराव डीडूळ सर,दिनकर बांगर,संदीप जाधव,पत्रकार महेश बेदरे,पत्रकार पोपट कोल्हे,पत्रकार विजय जाधव,पत्रकार प्रविण पोकळे,नगरसेवक नय्युम पठाण,रामेश्वर गोरे,सुनिल वाघमारे, किशोर अडागळे, रमेशराव पाखरे,रावसाहेब बांगर,सचिन गाडेकर, सुशिल कोठेकर,पिनु घोलप,ॲड.सुधीर घुमरे,अरुण मठपती सह विविध मान्यवर, महंत,पदाधिकारी व महानुभव पंथीय बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नानासाहेब डिडुळ,सतीश बप्पा जाधव,विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष दिनकर बांगर,सचिव अरुण मठपती सह सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.प्रास्ताविक दिनकर बांगर यांनी केले तर सुत्रसंचलन संदीप जाधव यांनी केले आभार नानासाहेब डीडुळ यांनी मानले.

### माणुसकीचा विजय: हिंदू बांधवांनी मुस्लिम

झाला. समाजात राजकीय स्तरावर कितीही मतभेद असले, तरी महाराष्ट्राच्या संस्कृतीत रुजलेली एकता आणि मानवता अजूनही तितकीच जिवंत असल्याचे या प्रसंगातून दिसून आले.घटनेनंतर त्या व्यक्तीस पुढील उपचारासाठी माजलगाव ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. यासाठी समाजसेवक नितीन जगताप यांनीही मोठी मदत केली. विशेष बाब म्हणजे, त्यांच्या पायाला फ्रॅक्चर असतानाही त्यांनी स्वतःची पर्वा न करता आपल्या नव्या गाडीतून त्या व्यक्तीला तात्काळ रुग्णालयात दाखल केले. फाशी घेण्यामागील कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलीस पुढील तपास करत आहेत

### तुलसी कॉलेज ऑफ फॅशन

उपस्थिती लाभणार आहे. विद्यार्थिनींना केवळ शिक्षण न देता त्यांना उद्योजक बनवणे या ध्येयाने हे शोरूम सुरू करण्यात आले आहे. फॅशन डिझाईनच्या विद्यार्थिनींनी तयार केलेले कलात्मक पेहराव आता थेट ग्राहकांसाठी उपलब्ध होणार आहेत. महाविद्यालयाची नवीन इमारत आधुनिक सोयी-सुविधांनी सज्ज असून, यामुळे जिल्ह्यातील फॅशन शिक्षणाला नवी दिशा मिळणार आहे. या प्रेरणादायी आणि ऐतिहासिक सोहळ्यास सर्व क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पालक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थिनींच्या या नव्या प्रवासाला बळ द्यावे, असे आवाहन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.अश्विनी बेद्रे यांचेसह प्राध्यापक व कर्मचारीवृंद यांनी केले आहे.

## मयत ऊसतोड मजुराच्या कुटुंबियांना मिळवून दिला विमा

### उपसरपंच अनिलराधे कांबळे यांचा यशस्वी पाठपुरावा

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील ब्रह्मगाव येथील ऊसतोड मजूर बालासाहेब दासु कांबळे यांचा मृत्यू झाला होता. याबाबत माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते तथा ऊसतोड मजूर कामगार संघटनेचे अध्यक्ष अनिल राधे कांबळे यांनी संबंधित साखर कारखान्याकडे सतत पाठपुरावा करून मयत कांबळे यांच्या कुटुंबियांना तीन लाख रुपयांचा विमा मिळवुन दिला आहे.



ऊसतोडणी हंगाम २०२५ – २०२६ मध्ये अंबादास सोमा चव्हाण ठेकेदार ऊस तोडणी वाहतुक यांचे मजुर बालासाहेब दासु कांबळे हे माजलगांव सिंदफणा नदी मध्ये बुडून मृत्यु

पावले होते. परंतु जय महेश साखर कारखाना प्रशासनाने संबंधित मजुराच्या विमा उतरविला होता. मयत बालासाहेब कांबळे यांच्या कुटुंबीयांनी सदरील विमा मिळावा याकरिता अनिल राधे कांबळे यांची भेट घेतली होती. त्यावर त्यांनी कुटुंबियांना दिलासा देत जय महेश साखर कारखान्याकडे सतत पाठपुरावा करून सदरील विमा बाळासाहेब कांबळे यांचा कुटुंबीयांच्या खात्यावर ३,००,०००/- अक्षरी तीन लाख रुपये त्याच्या खात्यावर हस्तांतरीत करण्यात आले. याचे पत्र अनिल राधे कांबळे यांनी बालासाहेब कांबळे कुटुंबियांना देत यापुढेही काही गरज लागल्यास मदत करण्याचे आश्वासन दिले. दरम्यान विम्याची मदत मिळाल्यामुळे निश्चितच या कुटुंबियांना थोड्या प्रमाणात का होईना दिलासा मिळाला आहे.

## एकलव्य उच्च माध्यमिक विद्यालय चिखलबीडचा उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम





वडवणी । प्रतिनिधी

इयत्ता बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला असून एकलव्य उच्च माध्यमिक विद्यालयाने उज्वल यशाची परंपरा याही वर्षी कायम राखली आहे विज्ञान शाखेतून एकूण १२१विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते त्यापैकी १२१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विज्ञान शाखेचा निकाल १००%लागला आहे. विज्ञान शाखेतून. १) दराडे वैभव सदाशिव-८५.००% २) कु . चंदनशिव प्रिया अप्पासाहेब-८४.८३% ३) चव्हाण अक्षता देविदास- ८३.१७% ४) पाटील वैष्णवी विजयकुमार-८२.३३% ५) वनवे ज्ञानदा सुनील-८२.००% ५) मुंडे अभिषेक अरुण -८२.००% ६) घुगे अस्मिता विक्रम -८०.८३% ७) नेहरकर शिवानी बालासाहेब-८०.६७% तर २७ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. कला शाखेतून एकूण ३२ विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यापैकी ३१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत कला शाखेतून १) सदाफुले राजश्री राम- ७८.००% २) सदाफुले सोमनाथ राम-७४.००% ३) सांगळे अविदा दिनकर-७०.६७% ४) पंडित प्रतीक्षा अशोक-७०.५०%. ५) नाटकर पवन नवनाथ-७०.३३%.तर १५ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत.

उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्ष प्रा. सुशीलाताई मोराळे मॅडम ,डॉ. अजित दादा पाखरे सर, श्री शिवराज दादा पाखरे सर, प्राचार्य श्री कानडे सर ,श्री हंगे सर ,श्री आघाव सर, श्री चंदनशिव सर ,श्री बोंदर सर, श्री साखरे सर, श्री चव्हाण सर, श्री चोले सर ,श्री सानप सर ,श्री आंधळे सर, श्री गवारे सर ,श्री लव्हाळे सर, श्री यादव सर, श्रीमती देशमुख मॅडम, श्री ठोंबरे सर,श्री नेकनुरकर सर ,श्री बालासाहेब नेहरकर ,श्रीमती तोगे मॅडम ,गुरव मामा ,तांदळे सर, गावचे सरपंच व समस्त गावकऱ्यांनी अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या!

### खोलेश्वर नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित
### दिंद्रुड ता.माजलगाव जि.बीड

**नोंदणी क्रमांक: (रजि.बीएचआर/ बीएचआर/आरएसआर/सीआर/१५८/२०२२)**

**अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

(केवळ सभासदांसाठी)

खोलेश्वर नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, दिंद्रुड ता.माजलगाव जि.बीड च्या सर्व सभासदांना कळविण्यात येते कि, आपल्या पतसंस्थेची चौथी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.१७/०५/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता मुख्य कार्यालय ''माऊली कॉम्प्लेक्स '' दिंद्रुड ता.माजलगाव जि.बीड येथे आयोजित केली आहे. सदर सभेत विचार विनिमय करण्यात येणार आहे. तरी सर्व सभासदांनी उपस्थित राहावे हि विनंती

*** सभेपुढील विषय ***

१) मा.संचालक मंडळाने सादर केलेल्या दि.३१ मार्च २०२६ अखेरच्या वर्षाचा अहवाल, ताळेबंद, नफा- तोटा पत्रक मंजूर करणे बाबत. २) आर्थिक वर्ष २०२५-२०२६ च्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालास मान्यता देणे बाबत. ३) आर्थिक वर्ष २०२५-२०२६ अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे बाबत. ४) आर्थिक वर्ष २०२६-२०२७ करिता वैधानिक लेखापरीक्षकाचे नियुक्ती आणि त्यांचे मानधन निश्चित करणे बाबत. ५) आर्थिक वर्ष २०२६-२०२७ च्या अंदाजपत्रकास मान्यता देणे बाबत. ६) पतसंस्थेच्या दीर्घकालीन व्यवसायवाढीच्या उदिष्टास मान्यता देणे बाबत. ७) संचालक मंडळाने मान्यता दिलेल्या नविन सभासद अर्जाला मान्यता देणेबाबत. ८) संचालक मंडळाने मान्यता दिलेल्या राजीनामा अर्जाला मान्यता देणेबाबत. ९) वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणेबाबत. १०) मा.अध्यक्षांचे अनुमतीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयावर निर्णय घेणे बाबत.

**स्थळ – माउली कॉम्पलेक्स दिंद्रुड**
**खोलेश्वर नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित,**
**दिंद्रुड ता.माजलगाव जि.बीड –४३११२८**
**दिनांक : ०१.०५.२०२६**

**मा.संचालक मंडळाच्या आदेशावरून**
**स्वाक्षरित**
**मुख्यकार्यकारी अधिकारी**

**सूचना :–** सभेस आवश्यक असलेली गणसंख्या जर सकाळी ११:०० वाजेपर्यंत पूर्ण झाली नाही. तर ती सभा पुढे ढकलली जाईल व अशी पुढे ढकललेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी सकाळी ११:३० वाजता मूळ विषय पत्रिकेवरील कामकाज पार पाडण्यासाठी घेतली जाईल. त्यासाठी गणसंख्या असणे आवश्यक राहणार नाही.

**सभासदास महत्वाच्या सूचना**

१) सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे काही प्रश्न/सूचना मांडावयास असतील तर त्यांनी त्या दि.१४.०५.२०२६ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत, नोंदणीकृत कार्यालयात लेखी स्वरुपात द्याव्यात. २) ज्या सभासदांना नाव, पत्ता अथवा वारस नोंद बद्दल करावयाच्या असल्यास पतसंस्थेच्या नोंदणीकृत कार्यालयातील शेअर्स विभागात नोंद करून घ्यावी.

३) सभेची नोटीस पतसंस्थेच्या मुख्य कार्यालय व शाखा नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

## तथागताने दिलेल्या धम्माच्या अनुकरणातच मानवाचे कल्याण – एस.बी. मोरे

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा तालुका माजलगावच्या वतीन तथागत भगवान गौतम बुद्ध यांची २५७० व्या जयंती सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी वसाहत येथे उत्साहात साजरी करण्यात आली त्या अनुशंगाने दि १ मे २०२६ शुक्रवार रोजी सकाळी १०:०० वाजता पंचरंगी धम्म ध्वजाचे ध्वजारोहण भारतीय बौद्ध महासभा महिला तालुकाध्यक्षा मंदाताई साळवे यांच्या हस्ते करण्यात आले त्या नंतर पुढील कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणुन भारतीय बौद्ध महासभा बीड पुर्वचे संस्कार उपाध्यक्ष एस बी मोरे हे होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा तालुकाध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते तर या ठिकाणी प्रमुख मार्गदर्शनात बोलताना एस बी मोरे यांनी सिद्धार्थ गौतमाने राजघराण्यात जन्म घेतला परंतु रोहिनी नदीच्या पाण्यावरुन शाक्य आणी कोलीय यांच्यात होणा-या युद्धास शाक्य संघाचा सदस्य असताना विरोध करुण त्यांनी राजवैभव,पत्नी, पुत्र आणि सर्व ऐश्वर्याचा त्याग करून गृहत्याग केला व



प्रदीर्घ साधनेनंतर बोधीवृक्षाखाली त्यांना ज्ञानप्राप्ती झाली आणि ते 'बुद्ध' झाले - तथागत संम्यक संबुद्ध झाले .ज्ञानप्राप्तीनंतर त्यांनी मानवजातीसाठी दुःखनिवारणाचा मार्ग दिला तथागथाचा दु:ख मुक्तीचा मार्ग म्हणजे आर्य अष्टागीकमार्ग होय याचे अनुकरण करण्यातच मानवाचे कल्याण आहे असे प्रतिपादन केले कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभेच्या महिला जिल्हाध्यक्षा कमलताई डोंगरे, संस्कार उपाध्यक्षा लिलाताई उजगरे, संस्कार सचिव आशाताई मोरे, शामभाऊ वाघमारे,पर्यटन सचिव के व्ही साळवे,संघटक बी सी डोंगरे, शोभाताई भोजने सह जिल्हा तालुका शहर ग्रामीण पदाधिकारी व धम्म उपासक उपासिका मोठ्या संख्येन उपस्थीत होते या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन तालुका सरचिटणीस सिद्धार्थ वक्ते यांनी केले तर आभार संस्कार उपाध्यक्ष गुलाब धाईजे यांनी मानले,या कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभा महिला तालुका संस्कार उपाध्यक्षा वैशालीताई नवनाथ गायकवाड यांनी भोजनदान दिले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी,डि एस साळवे,मोहन काकडे,बळीराम काकडे,भगवान डोंगरे,बाबासाहेब घनघाव,राजेभाऊ साळवे,विशाल साळवे,समाधान साळवे, तात्यासाहेब साळवे,भानुदास साळवे,चंद्रकला साळवे,वंदना साळवे,अंतिका गायकवाड विशाखा वाघमारे, वंदना घनघाव सह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले

cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
रविवार दि.३ मे २०२६
४

# बीडचे कृषी प्रदर्शन शेतकऱ्यासाठी ठरत आहे वरदान







बीड :बीड सह मराठवाड्यातील शेतकऱ्यांना शेतीमधील विविध तंत्रज्ञान शेतीमालापासून उद्योग प्रक्रिया यासोबतच शेतीमालासाठी लागणारे अवजारे यासाठी भव्य असे कृषी प्रदर्शन बीड शहरातील मध्यवर्ती भागामध्ये होत आहे या कृषी प्रदर्शनामध्ये विविध अवसारे आणि शेतीपूरक व्यवसायासाठी लागणारे साहित्य याबरोबरच नवीन शेतकऱ्यासमोर ठेवले जाणार असल्याने हे कृषी प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहे.

मराठवाड्यातील शेतकर्यांना तंत्रज्ञानाची माहिती मिळावी या उद्देशाने गेल्या १८ वर्षांपासून किसान कृषि विकास प्रतिष्ठानच्या वतीने या प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिनांक ०५ मे दरम्यान किसान कृषी महोत्सव या कृषि प्रदर्शनात द्वारे छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण ( मल्टीपर्पज ग्राउंड )बीड या मैदानात भव्य अशा ५ दिवसीय राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. मराठवाड्यातील शेतकर्यांना नवतंत्रज्ञान मिळावे म्हणून येथील किसान कृषी विकास प्रतिष्ठान मराठवाडाभर बीड, जालना, परभणी, हिंगोली सह इतर ठिकाणी या कृषी प्रदर्शनाचे आयोजन करते केले असून प्रकल्प संचालक आत्मा, महाराष्ट्र शासन कृषी विभाग, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी, महाएपीएसी फेडरेशन ओंकार साखर कारखाना सीड्स फर्टीलायझर डीलर इनपुट असोसिएशन यांचा यात विशेष सहभाग प्रदर्शनात असणार आहे. या कृषी प्रदर्शनामध्ये शेतकऱ्यांना मोफत स्टॉल देण्यात आलेले आहे व्यावसायिक कामांसाठी फीस ठेवण्यात आली असून अनेक शेतकरी या कृषी प्रदर्शनाचा लाभ घेताना दिसत आहे ऊन असतानाही शेतकऱ्यांची फोड या कृषी प्रदर्शनाकडे दिसून येत आहे पाच दिवस चालणाऱ्या या कृषी प्रदर्शनामध्ये दिनांक ४ मे रोजी जिल्ह्यातील उत्कृष्ट शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे या कार्यक्रमाला कृषी विभागाचे अधिकाऱ्यांसह लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत

## शेतकऱ्यांना मोफत स्टॉल

या कृषी प्रदर्शनामध्ये शेतकऱ्यांनी केलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी मोफत स्टॉल दिला जाणार असून स्वतः उत्पादित केलेल्या नाविन्यपूर्ण उद्योगाला मोफत स्टॉल दिले जेणेकरून या आपल्या लघु उद्योगास चालना मिळावी या दृष्टिकोनातून शेतकऱ्यांना मोफत स्टॉल दिले आहे

## संयोजकाचे चोख नियोजन

या मराठवाडा स्त्रीय कृषी प्रदर्शनाचे संयोजक महेश बेंद्रे यांनी या कृषी प्रदर्शनात येणाऱ्या कृषी अवजारे कृषी साहित्य बिर्याणी व अन्य स्टॉल यांचे योग्य नियोजन केले असून प्रत्येक स्टॉल धारकांना कुलर फॅन पाण्याची व्यवस्था केली गेली आहे याशिवाय दर दिवशी होणाऱ्या कार्यक्रमासाठी स्वतंत्र स्टेज देखील उभारण्यात आलेले आहेत.

**कोणार्क ब्रेड बिस्कीट स्टॉल लक्षवेधी :** कृषी प्रदर्शनामध्ये होणार या कंपनीने ज्याचे मालक अशोक गायकवाड यांचा स्टॉल लक्षवेधी ठरत आहे हे उपकरण म्हणजे गहू ज्वारी किंवा बाजरी मका या शेती पिकापासून तयार होणारे बिस्किट ब्रेड व अन्य पदार्थ तयार करणारी ही मशनरी आहे आज ज्वारी गहू यांचा बाजारात भाव कमी असला तरी मात्र त्यापासून होणारे उत्पादन शेतकऱ्याला अधिक नफा मिळवून देऊ शकतात यासाठी हा स्टॉल कृषी प्रदर्शनामध्ये अनेकांचे लक्ष वेधत आहे

# खरिपात येणाऱ्या किडींना आत्ताच आवरा

गेल्या काही वर्षात रासायनिक कीटकनाशकांचा होणारा अतिरेकी वापर हा किडींचा प्रादुर्भाव वाढण्यास कारणीभूत ठरतो आहे. किडींमध्ये किटकनाशकांबाबत निर्माण झालेली प्रतिकारशक्ती, दुय्यम किडींचा होणारा उद्रेक, मित्र किटकांची कमी होत चाललेली संख्या अशा परिस्थितीत वेळोवेळी शेतात निरीक्षण करून एकात्मिक किड नियंत्रणाचे विविध उपाय करावेत. त्यामुळे अनावश्यक फवारणी आणि त्यावरील खर्चात बचत होते.एकात्मिक कीड नियंत्रणाच्या दृष्टीने पूर्व हंगामी किड नियंत्रण करणे ही कीड नियंत्रणाची प्रभावी पद्धत आहे.

मशागतीमध्ये शेतात पिकाची फेरपालट करणे ही जुनी आणि पारंपारिक पद्धत आहे. त्यामुळे किडींना यजमान वनस्पती न मिळाल्यामुळे किडींचे नैसर्गिकपणे नियंत्रण मिळविण्यास मदत होते. पिकाचा हंगाम संपल्याबरोबर पिकाचे अवशेष, पऱ्हाट्या, तुराट्या यांचा पावसाळ्यापूर्वी वापर करून नष्ट कराव्यात किंवा कंपोस्ट साठी त्याचा वापर करावा. अन्यथा त्यावर किडींच्या विविध अवस्था येऊन पोषक वातावरणात त्यांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता राहते. शेताची तीन वर्षातून एकदा खोल नांगरणी करावी. म्हणजे जमिनीत असलेल्या किडींच्या अवस्था जमिनीवर येऊन उन्हामुळे किंवा भक्षक पक्षांद्वारे नष्ट होतील. पहिल्या पावसानंतर शेताच्या बांधावर असलेले तण नष्ट करावे. जेणेकरून किडीची पहिली पिढी तणांवर तयार होऊ शकणार नाही. येत्या खरीप हंगामासाठी तुम्ही जर घरचं बियाणं वापरणार असाल तर बियाण्यास चाळणी लावून किडके, अशक्त बियाणे वेगळे करून त्याची उगवण शक्ती तपासावी आणि त्यानुसार एकरी बियाणे वापरण्याचं प्रमाण ठरवून ठेवावे. उपलब्धतेनुसार कीड, रोग प्रतिकारक वाणाचा वापर करावा. बियाण्याची पेरणी करताना शिफारस केलेल्या अंतरानुसार पिकाची लागवड करावी. कारण पावसात खंड पडल्यास किडींच्या आक्रमणामुळे पिकाची हेक्टरी संख्या कमी होण्याची शक्यता असते. याशिवाय कपाशी आणि इतर पिके हंगामा बाहेर घेणं टाळावं. चांगल्या कुजलेल्या शेणखताचा वापर करावा. माती परीक्षण करूनच खताचा त्याप्रमाणे वापर करावा. नत्र खताचा अतिवापर करणं टाळावं. हंगामात वेळोवेळी आंतरमशागत करावी त्यामुळे किडीला पुरक अशा तणाचा नाश होतो. अशा प्रकारे मशागतीय पद्धतीचा अवलंब करुन पिकातील किडींना आटकाव करणे शक्य होते.

# गूळ तयार करण्यासाठी योग्य ऊस ओळखा

राज्यात मोठ्या प्रमाणात ऊस लागवड केली जाते. प्रामुख्याने महाराष्ट्र आणि उत्तरप्रदेश हे दोन राज्य देशातील आघाडीवरील ऊस उत्पादक राज्य आहेत. त्यामुळे या दोन्ही राज्यांमध्ये साखरनिर्मिती व्यवसाय आणि गूळ निर्मिती व्यवसाय चांगलाच बहरला आहे. मात्र आता गूळनिर्मिती करताना उसाची पारख कशी करायची? असा प्रश्न गुऱ्हाळ चालवणाऱ्या शेतकऱ्यांसमोर असतो. साधारणपणे शेतकरी पारंपरिक पद्धतीने अंदाज लावत उसाची निवड करतात. हे चुकीचे असून शेतकऱ्यांना त्यातून आर्थिक तोटा संभवतो. याच पार्श्वभूमीवर नेमकी गूळनिर्मिती व्यवसाय करताना काय काळजी घेतली पाहिजे? याबाबत आज आपण जाणून घेणार आहोत.



गूळनिर्मिती व्यवसायातील तज्ज्ञांच्या मते, ज्या उसाच्या माध्यमातून गूळनिर्मिती केली जाणार आहे. त्याची निवड करताना शेतात तोडणीच्या आधीपासूनच काळजी घेतली पाहिजे. त्यासाठी १२०० रुपयांना मिळणाऱ्या ब्रिक्स मीटर खरेदी करावे. वापरात असलेल्या उसाच्या रसाचे काही थेंब टाकून बघावेत. या मीटरमध्ये तुम्हाला आकाशी आणि सफेद असे दोन रंग दिसले. किंवा मग या मीटरमध्ये रसाची व्हॅल्यू ही २० हुन अधिक असेल तर तो ऊस गूळनिर्मितीसाठी सर्वोत्तम मानला जातो. इतकेच नाही तर गूळनिर्मितीसाठी उसाची तोडणी केल्यानंतर हा ऊस अधिक काळ तसाच न ठेवता. त्याचे २४ तासांच्या आत गाळप होणे आवश्यक असते. याशिवाय गाळपाला काहीसा वेळ असेल तर तोडणी करून आणलेला ऊस उन्हात ठेवू नये. यामुळे प्रत्येक दोन तासाला उसातील २ टक्के सुक्रोजची घट होते. हे गूळनिर्मिती साठी खूप नुकसानदायी ठरू शकते. त्यामुळे सकाळी आणल्यानंतर दिवसभरात त्या उसाचे गाळप होणे गरजेचे असते.

गाळपानंतर पुढील प्रक्रिया गूळनिर्मितीसाठी रस कढईत टाकण्याची असते. उसाचा कढईत टाकल्यानंतर त्यातील सुक्रोज हे ग्लूकोज आणि फ्लोक्टोजमध्ये रूपांतरित होऊ नये. म्हणून शेतकऱ्यांनी काळजी घेतली पाहिजे. यासाठी तुरटीचा वापर देखील केला जाऊ शकतो. किंवा मग संबंधित उसाच्या रसाचा पीच देखील जाणून घेतला जाऊ शकतो. तो ६.४ ते ६.८ दरम्यान असणे आवश्यक असते. संपूर्ण गूळनिर्मिती प्रक्रिया दरम्यान खूप काळजी घ्यावी लागते. मात्र, या त्यातील काही महत्वाच्या स्टेप्स आहेत. ज्या गूळनिर्मिती व्यवसायातील तोटा कमी करण्यास अर्थात आर्थिक नुकसान टाळण्यास मदत होते. याशिवाय शेतकऱ्यांनी उसाचा रस काढण्यासाठी हॉरिझॉन्टल क्रॉशर (आडवे रस यंत्र) वापरले पाहिजे. ज्यामुळे १० टक्के अधिक रस मिळण्यास मदत होते. इतकेच नाही तर कढईमध्ये रस उकळवताना ११४ डिग्रीपर्यंत उकळला पाहिजे. त्यापेक्षा अधिकही नको आणि कमीही नको. या योग्य तापमानात रस उकळल्यास त्यातून उत्तम प्रतीचा गूळ बनतो. साखर कारखान्यात साखर तयार करण्यासाठी १२१ डिग्रीपर्यंत उसाचा रस उकळला जातो.

# तुरीसोबतच इतर आंतरपिकेही आहेत फायद्याची

शेतीतून शाश्वत उत्पादनासाठी आंतरपिके घेणे ही एक चांगली पद्धत आहे. गेल्या दशकापासून हवामानात झालेला बदल, गारपीट, अवकाळी पाऊस, दुष्काळ, टंचाई यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. अशा परिस्थितीत आंतरपीक पद्धतीमुळे दुष्काळाची झळ कमी बसते आणि पाऊसमान योग्य असल्यास हेक्टरी अधिक धान्योत्पादन होते.

आंतरपीक घेण्याच्या पद्धती : अवर्षणप्रवण भागातील कोरडवाहू क्षेत्रात बाजरी, सूर्यफुल, तूर, उडीद, मूग, हुलगा, मटकी इत्यादी महत्त्वाची खरीप पिके आहेत. अति उथळ जमिनीवर सुधारित गवताबरोबर हुलगा किंवा मटकी आणि उथळ जमिनीत बाजरी किंवा सुर्यफूल + तूर (२:१) ओळी या प्रमाणात आंतरपीक पद्धतीची शिफारस केली आहे.



तुरीत आंतरपीक घेण्याचे फायदे : कमी पाण्यात, कमी कालावधीत, कमी उत्पादन खर्चात तूर किंवा इतर आंतरपीक पद्धतीचा अवलंब केल्यास शेतकऱ्यांना फायदेशीर ठरते. पट्टा पद्धतीत तूर पेरणी केल्यानंतर जोड ओळीतील प्रत्येक तुरीच्या झाडास भरपूर सूर्यप्रकाश, मोकळी हवा मिळते,त्यामुळे फुलांचे शेंगांमध्ये रूपांतर करण्याची क्षमता वाढते. व उत्पादकतेत वाढ होते. तुरीच्या पिकातून जमिनीवर पडणारा पालापाचोळा यापासून मिळणाऱ्या सेंद्रिय खतामुळे जमिनीचे आरोग्य सुधारण्यास मदत होते. एकरी अर्धा टन सेंद्रिय खत जमिनीस मिळते. तूर पिकामुळे पुढील पिकास एकरी ५० ते ८० किलो नत्र मिळते. तुरीच्या वाढीच्या काळात जमिनीवर पालापाचोळयाच आच्छादन तयार होते ,त्यामुळे जमिनीवरील ओल्यावर येणार्या लव्हाळा व इतर तणांचे नियंत्रण होण्यास मदत होते. तूर हे कडधान्य पीक असल्यामुळे त्याच्या मुळावरील गाठीत रायझोबियम नावाचे सूक्ष्म जीवाणू असतात ते हवेतील नत्र शोषून जमिनीत गाडतात आणि पुढील पिकास उपलब्ध करून देतात, त्यामुळे जमिनीची सुपिकता वाढते.

तुरीचे आंतरपीक व्यवस्थापन : पारंपारिक पद्धतीत तुरीच्या दोन ओळीतील अंतर दोन ते अडीच फुट ठेवतात. मात्र त्यामुळे तुरीवरील फवारणी करण्यात अनेक अडचणी येतात. तुरीच्या दोन ओळीत ९० से.मी अंतर आणि १८० से.मी. पट्टा परत पुन्हा ९० से.मी. अंतराच्या तुरीच्या जोडओळी या प्रयोगातून तुरीची उत्पादकता वाढविण्याबरोबरच आंतरपिकांचा लाभ मिळवता येईल. तुरीच्या दोन ओळीत जी सरी पडली जाईल, तिच्यात पावसाचे पाणी मुरेल या ओलाव्याचा तुरीला लाभ होईल. तुरीची मुळे जमिनीत खोलवर जातात, त्यामुळे जमीन भुसभुशीत पोकळ होते.

बाजरी - तूर किंवा सुर्यफुल - तूर

कोरडवाहू शेती संशोधन केंद्र,सोलापूर येथे अनेक वर्षाच्या प्रयोगातून बाजरी - तूर (२:१) किंवा सुर्यफुल -तूर (२:१) ह्या आंतरपीक पद्धतीमुळे अनुक्रमे ७० आणि ८४ टक्के उत्पादनात वाढ झाली आहे. आंतरपिकातील बाजरी व सूर्यफुलाचा कालावधी ८० ते ९० दिवसाचा असतो. तर तुरीच्या वाणानुसार १२५ ते १६० दिवसांचा राहील. बाजरी अगर सूर्यफुल काढल्यानंतर राहलेल्या कालावधीतील पाऊस, सूर्यप्रकाश,जमिनीतील ओलावा, अन्नद्रव्ये व जागा ह्याचा तुरीच्या वाढीस उपयोग होतो. बाजरी/ सूर्यफुलाची मुळे तंतुमय असल्यामुळे जमिनीच्या वरच्या थरातील ओलावा, अन्नद्रव्याचे शोषण होते. तर तुरीस सोटमूळ असल्यामुळे जमिनीतील खालच्या थरातील अन्नद्रव्ये व ओलाव्याचे शोषण होते. त्यामुळे ती एकमेकास पूरक ठरतात.

तूर - सोयाबीन : अलीकडच्या काळात तूर - सोयाबीन (१:३ किंवा १:४) पद्धतीने पेरल्यास दोन्ही पिकांचे चांगले उत्पादन येत असल्याचे दिसून आले आहे. सोयाबीनच्या ओळीमध्ये ३० से.मी. तर दोन रोपांमध्ये १० से.मी. अंतर ठेवावे आणि सोयाबीनच्या तीन ओळीनंतर एक ओळ तुरीची पेरावी. तुरीच्या दोन ओळीतील अंतर १२० से.मी. येते. तुरीच्या दोन रोपातील अंतर २० से.मी. ठेवावे. सोयाबीन बियाणे ६० ते ६५ किलो प्रति हेक्टर तर ५ किलो तुरीचे बियाणे प्रति हेक्टरला पुरेसे आहे.

बाजरी - तूर अगर सूर्यफुल - तूर :

या आंतरपीक पद्धतीत बाजरी/सूर्यफुल काढल्यानंतर मशागत करणे महत्त्वाचे असते. कारण मुख्य पीक निघाल्यानंतर, दुसर्या पिकांकरिता ओळ टिकवून ठेवणे गरजेचे आहे. त्याकरिता पीक काढल्याबरोबर कुळव चालवून तण व धसकटे उपटून काढून तेथेच वाळू द्यावीत.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५२९ : घाघरा येथील युद्धात मुघल सम्राट बाबर यांनी बंगाल आणि बिहारच्या शासकांचा पराभव केला.
१५३६ : इंग्लंडचे राजा हेनरी अष्टम यांनी प्रत्येक गीरीजाघरात बाईबल हे धार्मिक पुस्तक ठेवण्यास सांगितले.
१५४२ : सेंट फ्रान्सिस झेव्हिअर तत्कालीन पोर्तुगीज गोव्याची राजधानी ओल्ड गोवा येथे पोहोचला.
१६३२ : शहाजहान बादशहा व आदिलशहा यांच्यामधे शहाजीला पराभूत करण्याबद्दल तह झाला.
१८१८ : वैशाख शु. १ शके १७४० राजधानी रायगड लढवत असताना शेवटच्या बाजीरावाची पत्नी वाराणशीबाई इंग्रजांकडून पराभूत झाली.
१८३५ : अमेरिकन वर्तमानपत्र न्यूयॉर्क हेरॉल्ड चे प्रकाशण करण्यास सुरुवात झाली.
१८४० : एक पेनी किमतीचे 'पेनी ब्लॅक' नावाचे जगातील पहिले टपाल तिकीट इंग्लंडमध्ये विक्रीसाठी खुले झाले. हे तिकीट १ मे १८४० रोजी जारी झाले होते.
१८८९ : पॅरिसमधील 'आयफेल टॉवर'चे उद्घाटन झाले.
१९१० : ब्रिटीश शासक एडवर्ड सप्तम यांच्या निधनानंतर त्यांची गाद्दी त्यांचे पुत्र जॉर्ज पंचम यांनी सांभाळली.
१९४४ : पुणे येथील आगा खान पॅलेस मधून महात्मा गांधी यांची सुटका झाली.
१९४९ : ईडीएसएसी पहिले इलेक्ट्रॉनिक डिजिटल संचयित संगणक सॉफ्टवेअर सुरु झाले.
१९५४ : रॉजर बॅनिस्टर हे १ मैल चार मिनिटांच्या आत धावणारे पाहिले व्यक्ती ठरले.
१९८३ : अडोल्फ हिटलर यांच्या डायरीचा लबाडी म्हणून खुलासा केला गेला.
१९९४ : इंग्लंडची राणी एलिझाबेथ (दुसरी) आणि फ्रान्सचे अध्यक्ष फ्रँकॉइस मित्राँ यांच्या हस्ते इंग्लिश खाडीखालुन जाणार्या आणि इंग्लंड व फ्रान्स यांना जोडणार्या 'युरो टनेल'चे उद्घाटन झाले.
१९९७ : 'बँक ऑफ इंग्लंड'ला स्वायत्तता देण्यात आली.
१९९९ : महाराष्ट्र राज्यातील सर्व कृषी विद्यापीठांत महिलांना तीस टक्के आरक्षणाचा निर्णय घेण्यात आला. अस निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले.
२००१ : पोप जॉन पॉल (दुसरे) यांनी सिरीयातील एका मशिदीस भेट दिली. मशिदीस भेट देणारे ते पहिलेच पोप होत.
२००२ : भूपिंदर नाथ किरपाल यांनी भारताचे ३१ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
२०१५ : सलमान खान यांना सदोष मनुष्यवधाच्या आरोपास दोषी ठरवून ५ वर्ष्यांच्या कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच सलमान खान यांची हायकोर्टात अपील दाखल करून, जामिनावर सुटका.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५६ : सिग्मंड फ्रॉईड ऑस्ट्रियन मानसशास्त्रज्ञ, आधुनिक मानसशास्त्राचा जनक (मृत्यू: २३ सप्टेंबर १९३९)
१८६१ : मोतीलाल गंगाधर नेहरू भारतीय स्वातंत्र्यसेनानी, स्वराज्य पक्षाचे संस्थापक सदस्य, कायदेपंडित (मृत्यू: ६ फेब्रुवारी १९३१)
१९२० : बुलो चंदीराम रामचंदानी ऊर्फ बुलो सी. रानी जुन्या पिढीतील संगीतकार व गायक (मृत्यू: २४ मे १९९३ मुंबई)
१९४० : प्रसिद्ध महिला तबलावादक, गायिका आणि संगीतज्ञ अबन मिस्त्री यांचा जन्म.
१९४३ : लेखिका वीणा चंद्रकांत गावाणकर यांचा जन्म.
१९५१ : लीला सॅमसन भरतनाट्यम नर्तिका, नृत्यदिग्दर्शिका आणि लेखिका. संगीत नाटक अकादमी आणि फिल्म सेन्सॉर बोर्डाच्या अध्यक्षा
१९५३ : टोनी ब्लेअर ब्रिटनचे पंतप्रधान आणि मजूर पक्षाचे अध्यक्ष
१९६४: अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय जलतरणपटू खजान सिंह यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५८९ : रामतनू पांडे ऊर्फ मोहमाद आट्टा खान तथा संगीतसम्राट तानसेन अकबराच्या दरबारातील एक नवरत्न (जन्म: १५०६)
१८६२ : हेन्री थोरो अमेरिकन लेखक व विचारवंत (जन्म: १२ जुलै १८१७)
१९२२ : छत्रपती शाहू महाराज सामाजिक सुधारणांचे कृतीशील पुरस्कर्ते, कला, नाटक, संगीत यांचे प्रोत्साहक (जन्म: २६ जून १८७४)
१९४६ : भुलाभाई देसाई स्वातंत्र्यसेनानी व कायदेपंडित, त्यांनी होमरुल चळवळीतील कार्यकर्ते, १९३१ मधे 'गांधी-आयर्विन' कराराप्रमाणे त्यांनी बार्डोलीच्या शेतकर्यांची बाजू मांडली. १९३२ मध्ये कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतल्याबद्दल त्यांना एक वर्षाचा कारावास व दहा हजार रुपये दंड अशी शिक्षा झाली होती. (जन्म: १३ आक्टोबर १८७७)
१९५२ : मारिया माँटेसरी इटालियन डॉक्टर व शिक्षणतज्ञ. पूर्वप्राथमिक शिक्षणाविषयीच्या त्यांच्या उपक्रमामुळे तशा शाळा 'माँटेसरी' या नावाने ओळखल्या जातात. (जन्म: ३१ ऑगस्ट १८७०)
१९६६ : रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे भारतातील पहिले सिनिअर रँग्लर, फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू, मुंबई राज्याचे शिक्षणमंत्री, भारताचे ऑस्ट्रेलियातील उच्चायुक्त (जन्म: १६ फेब्रुवारी १८७६)
१९९५ : आचार्य गोविंदराव गोसावी प्रवचनकार, संत वाङ्मयाचे गाढे अभ्यासक, हैदराबाद मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिक.
१९९९ : कृष्णाजी शंकर हिंगवे पुणे विद्यापीठातील जयकर ग्रंथालयाचे पहिले ग्रंथपाल व संस्थापक सदस्य.
२००१ : विख्यात मराठी कादंबरीकार, लेखिका मालतीबाई बेडेकर यांचे पुणे येथे निधन.
२००६ : जगातील सर्वात मोठे प्रवासी जहाज टायटनिक च्या दुर्घटनेचे साक्षीदार अमेरिकन नागरिक लिलियन एस्प्लंट यांचे निधन.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# विकासासाठी सर्वांच्या एकत्र प्रयत्नांची आवश्यकता -पालकमंत्री

## रायझिंग जालना २०२६'ला नागरिकांचा उस्फूर्त प्रसिसाद

जालना। प्रतिनिधी

जालना जिल्ह्याचा इतिहास समृध्द असुन, विकसनशील जिल्हा म्हणुन आपल्या जिल्ह्याची ओळख आहे. स्टिल-सिल्क-सिड्स या क्षेत्रातील विकासामुळे जालना जिल्ह्याचे नाव जगभर प्रसिध्द आहे. आशाचप्रकारे आपल्या जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी सर्वांनी एकत्रिक काम करण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे यांनी केले.येथील अग्रेसन भवन येथे जालना जिल्हा प्रशासनाच्या वतीने आयोजित 'रायझिंग जालना २०२६' कार्यक्रमाच्या उद्घाटनाप्रसंगी श्रीमती मुंडे या बोलत होत्या. यावेळी महापौर श्रीमती वंदना मगरे, खासदार डॉ. कल्याण काळे, आमदार राजेश राठोड, अर्जून खोतकर, उपमहापौर राजेश राऊत, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कंवरिया, मनपा आयुक्त अंजली




शर्मा, अपर पोलिस अधिक्षक आयुष नोपाणी, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पालकमंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, आज 'रायझिंग जालना २०२६' या उपक्रमाच्या निमित्ताने आपण सर्व एकत्रीत आलो आहोत, ही अत्यंत अभिमानाची आणि प्रेरणादायी गोष्ट आहे. जालना जिल्हा हा केवळ मराठवाड्याचा नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राचा औद्योगिक, कृषी आणि सांस्कृतिक विकासाचा महत्त्वाचा केंद्रबिंदू बनत आहे. यासाठी आपण सर्वांनी केलेल्या प्रयत्नामुळेच हा विकास झालेला आहे. माझ्यासाठी, पालकमंत्री म्हणून, हा केवळ एक प्रकल्प नाही. तर जालन्याच्या उज्ज्वल भविष्यासाठीचा एक ठोस संकल्प आहे. आज आपण 'रायझिंग जालना २०२६' द्वारे उद्योग, शेती, शिक्षण आणि पायाभूत सुविधांमध्ये मोठी झेप घेण्याचा निर्धार करण्यात आला आहे. स्वत:ची ओळख विसरुन जो काम करतो, तोच विकासाची कामे करु शकतो. कोणत्याही विकासाचा जन्म हा, अस्तित्वात नसलेल्या गोष्टीपासुनच होत असतो. आपल्या जिल्ह्याची ओळख ही स्टील उद्योग, बियाणे उद्योग आणि प्रगतिशील शेतीमुळे आहे. आता वेळ आली आहे की, आपण या ओळखीला नव्या उंचीवर घेऊन जाऊया. नवीन गुंतवणूक आकर्षित करून, तरुणांसाठी रोजगारनिर्मिती करून आणि तंत्रज्ञानाचा वापर करून विकासाला गती देऊ. राज्य शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून आपण जालना जिल्ह्यात रस्ते, पाणीपुरवठा, औद्योगिक वसाहती आणि डिजिटल सुविधा यामध्ये मोठ्या प्रमाणावर सुधारणा करत आहोत. ' ' साठी जालना हा एक आदर्श जिल्हा बनवण्यासाठी आपण एकत्रित येऊन काम करूया, असेही पालकमंत्री श्रीमती मुंडे यावेळी म्हणाल्या. यावेळी आमदार श्री. खोतकर म्हणाले की, कोणत्याही जिल्ह्याचा विकास हे शासन आणि प्रशासन यांच्या समन्वयानेच होत असतो. आपला जालना जिल्हा विविध क्षेत्रात भरारी घेत असुन, ड्रायपोर्ट, लॉजीस्टीक, रेल्वेचे दुहेरीकरण, रेल्वेचे विद्युतीकरण, वैद्यकीय महाविद्यालय आदी विकास कामाच्या माध्यमातून बदलताना आपणांस दिसत आहे. आपण शहरासाठी पाणीपुरवठा योजना, सौर प्रकल्प, कुंड निर्मिती आदी विकास कामे केलीत. जालना करीता १२० कोटी रुपयाचे विपश्यना केंद्र मंजूर करुन घेतल्याचेही त्यांनी सांगितले. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल प्रास्ताविकात म्हणाल्या की, जालना जिल्ह्याच्या स्थापनेला ४५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने जिल्हा प्रशासनाच्या वतीने 'रायझिंग जालना' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रगती, नवोन्मेष, एकता आणि समृद्धीच्या दिशेने वाटचाल दर्शविणारा हा कार्यक्रम जिल्ह्याच्या विकासाचा आढावा घेणारा आणि भविष्यातील दिशा ठरविणारा ठरणार असल्याचे सांगितले. तसेच जालना जिल्ह्याच्या ४५ वर्षांच्या वाटचालीतील उल्लेखनीय कामगिरी, विविध विकास प्रकल्प, तसेच आगामी योजनांचे सादरीकरणाद्वारे त्यांनी माहिती सादर केली. कार्यक्रमाच्या प्रारंभी परतुर विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया यांना श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी विविध स्टॉलला भेटी देवून माहिती जाणुन घेतली. तसेच पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते 'रायझिंग जालना' लोगो, 'ताईचा कट्टा', 'माझे गाव आरोग्य संपन्न गाव' आणि 'जालना सुपर ५० शेतकरी' या उपक्रामाचे उद्घाटन करण्यात आले.

## शिक्षणासोबत संस्कार महत्त्वाचे : पायलताई बाफना

### एकलव्य व तक्षशिला स्कूलमध्ये महाराष्ट्र दिन उत्साहात; पायलताई बाफना यांचे हस्ते ध्वजारोहण

जामखेड। प्रतिनिधी

शहरासह तालुक्यातील विद्यार्थिनी व महिलांच्या स्वावलंबनासाठी तसेच त्यांच्या सुरक्षिततेसाठी सातत्याने काम करत राहणार असल्याचे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या पायलताई आकाश बाफना यांनी केले. शहरातील एकलव्य व तक्षशिला प्रायमरी स्कूलमध्ये महाराष्ट्र दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आज दिनांक १ मे रोजी सकाळी ८.१५ वाजता पायलताई आकाश बाफना यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.या कार्यक्रमासाठी शिवसेना युवा नेते आकाश बाफना, पोलीस उपनिरीक्षक गणेश भागडे, पोलीस कॉन्स्टेबल देविदास पळसे, पत्रकार धनराज पवार,प्रल्हाद जावळे, शिवाजी डोंगरे, विजय टेकाळे, अमोल लोहार तसेच मुख्याध्यापक अशोक जावळे, अशोक आजबे यांच्यासह पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आकाश बाफना यांनी बोलताना



सांगितले की, शहर व तालुक्यातील शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात येणार असून आजचे विद्यार्थी हेच उद्याचे जामखेडचे भविष्य आहेत. त्यामुळे शिक्षणासोबतच चांगले संस्कार होणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे सांगितले. एकलव्य व तक्षशिला प्रायमरी स्कूलमध्ये मंथन स्पर्धा परीक्षा नियमित घेतल्या जात असून विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच चांगले संस्कार दिले जातात. यामुळेच या शाळेकडे पालक व विद्यार्थ्यांचा वाढता कल दिसून येत आहे. यावेळी पायलताई बाफना व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षिका रेखा फुले, पल्लवी बेंद्रे, स्वाती तवटे, कालिंदी पोकळे, ज्योती नागरगोजे, निता काळे, उषा ढोले, रेखा निगुडे, अश्विनी महारनवर व मदतनीस द्रौपदी खराडे आदींनी परिश्रम घेतले.

## आरटीई प्रवेशासाठी ४ हजाराची लाच घेतांना मास्तर पकडला

जालना । प्रतिनिधी

शाम निवृत्ती भांदरगे वय ४१ वर्ष पदः-विशेय शिक्षक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पीर पिंपळगाव ता. जालना संलग्न गट शिक्षण अधिकारी कार्यालय पंचायत समिती अंतर्गत वर्ग ३ यांना लाचेची रक्कम स्वीकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले. सदरील घटना दि.३०/०४/२०२६ रोजी गटशिक्षण अधिकारी कार्यालय, पंचायत समित्ती जालना येथे घडली तक्रारदार यांच्या मुलीचा आर टी ई २०२६-२७(राइट टू एजुकेशन एक्ट २००९) साठी ऑन लाईन फॉर्म भरला होता त्यामध्ये तक्रारदार यांच्या मुलीची निवड झाली होती त्यानुसार तक्रारदार या ३०/०४/२०२६ रोजी गट शिक्षण अधिकारी कार्यालय जालना येथे कागद पत्राची पडताळणी करण्यासाठी गेल्या असता तेथील लोकसेवक शाम भांदरगे यांनी तक्रारदार यांचे मलीचे आर टी ई प्रवेशाचे कागदपत्रात कोणतीही त्रुटी न काढण्यासाठी ४,०००/-रू लाचेची मागणी केली. आशा आशयाची तक्रार जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दिली.

दिनाक ३०/०४/२०२६ रोजी पंचासमक्ष लाच मरागणी पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक शाम निवृत्ती भांदरगे याना भेटले असता त्यांनी तक्रारदार यांचेकडे त्याचे मुलीचे आर टी ई प्रवेशाचे कागदपत्रात कोणतीही त्रुटी न काढण्यासाठी ४,०००/-रु लाचेची मागणी करुन स्वीकारण्याची सहमती दर्शवली असल्याचे, निष्पन्न झाले. केलेल्या पडताळणीत सत्यता आढळून आल्याने पंचासमक्ष दिनांक-३०/०४/२०२६ रोजी सापळा कारवाई करण्यात आली यावेळी पोलीस उप अधिक्षक श्री.बाळु जाधवर, लाचलुचपत प्रतिबंधक पथक जालना व त्यांच्या पथकातील अंमलदार यांनी ताब्यात घेतले. आलोसे यांची अंगझडती घेतली असता लाचेचे ४,०००/-रू त्यांचे शर्ट चे खिश्यात व पेट चे खिश्यात ३५,०५०/-रु असे एकून ३९,०५०/- रुपये व एक मोबाईल, एक बड्याळ मिळून आले आहे. आलोसे शाम निवृत्ती भांदरगे यांचेवर पोलीस ठाणे कदीम जालना येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदरची कामगीरी श्रीमती माधुरी केदार कांगणे, पोलीस अधीक्षक, ला. प्र. वि. श्री. शशिकांत सिगारे, अपर पोलीस अधीक्षक, ला. प्र. वि.यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी बी. एस. जाधवर, पोलीस उप अधीक्षक, यांनी व पथकातील पोलीस हवालदार पोहेकों / गजानन घायवट, अतिश तिडके, गजानन खरात. पो. अंमलदार मनोहर भुतेकर, शिवलिंग खुळे, गणेश चेके, अमोल चेके, गजानन कांबळे,

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-१३**
**दिनांक - ०१/०४/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय
अर्जदार श्रीमान/श्रीमती अजिमखाँ निजामखाँ पठाण रा. नागझरी ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अदिबा अजिमखॉ पठाण | मुलगी | ०५/०७/२०१६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**जाहिर प्रगटन**

सर्व आम जनतेस जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, माझे अशील अमर ईद्रीस बाशन व शेख माजेद शेख अ. कय्युम यांनी मौजे लालवाडी ता. अंबड जि. जालना गट नं. १५२/२ क्षेत्र ०४हे. ८५ आर आकार ०९रू ६५ पैसे पैकी राजू किसन शिंदे रा. लालवाडी ता. अंबड जि. जालना यांच्या मालकी व ताब्यातील ००हे. १६ आर संपूर्ण जमिन ही जालना बीड रोड वरील सरकारी नियमाप्रमाणे हद्द सोडून ज्याच्या चतुः सिमा पुर्वेस सरकारी शिव शेवगा, पश्चिमेस जालना- अंबड रोड, दक्षिणेस मधुकर बांडे यांची जमिन, उत्तरेस- प्रकाश शिंदे यांची जमिन, या चतुः सिमेच्या आतील असलेली राजू किसन शिंदे यांची जमिन खरेदी करण्यासाठी माझे अशील यांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचा ईसारपावती / करारनामा केला आहे. या मिळकतीचे मालक व कब्जेदार राजू किसन शिंदे यांनी माझ्या अशीलास असा विश्वास दिला आहे की, सदर मिळकत ही निर्विवाद आहे तरी या जाहिर प्रगटनाद्वारे माझे अशील हे सूचित करतात की, या मिळकतीविषयी कोणाचे हितसंबंध, गहाण, तारण, विक्री करण्याचा करार, चोळी बांगडी, न्यायालयीन दावे, प्रतिदावे असल्यास आठ दिवसांच्या आत माझ्या कार्यालयात योग्य कायदेशीर कागदपत्राद्वारे आक्षेप नोंदविण्यात यावा. मुदतीनंतर आलेला आक्षेप स्विकारला जाणार नाही व माझे आशील हे नोंदणीकृत खरेदीखताआधारे सदर मिळकत खरेदी करतील करीता हे जाहिर प्रगटन.

दि. ०२/०५/२०२६

स्वाक्षरित
मार्फत
ॲड.एम.एल. केजभट
जिल्हा व सत्र न्यायालय अंबड ता. अंबड जि. जालना
मो.नं. ७६२०७७४३८०

## भगवान नरोडे सह बारा पोलीस अधिकारीना सन्मानचिन्ह

जालना। प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील १२ पोलीस अधिकारी आणि अंमलदारांना पोलीस महासंचालकाचे सन्मानचिन्ह जाहीर पोलीस निरीक्षक संदीप भारती, अंबड पोलीस स्टेशनचे पोलीस



उपनिरीक्षक भगवान नरोडे यांचा समावेश राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी पोलीस दलात विविध प्रकारच्या सेवा उपक्रमामध्ये उत्तम सेवा बजावणाऱ्या पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदारांना सन-२०२५या वर्षासाठी


पोलीस महासंचालकाचे सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र जाहीर केले आहे. यामध्ये जालना जिल्हा पोलीस दलातील एक पोलीस निरीक्षक, एक पोलीस उपनिरीक्षक आणि ९ पोलीस अंमलदार यांचा समावेश आहे. तसेच, जालना पोलीस प्रशिक्षण केंद्रातील पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर पायघन यांचा देखील यामध्ये समावेश आहे. सदर बाजार त्याचे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भारती, अंबड पोलीस ठाण्याचे

पोलीस उपनिरीक्षक भगवान नरोडे, तसेच सहाय्यक फौजदार विजय आढाव, सहाय्यक फौजदार उमा घोरपडे (महिला तक्रार निवारण कक्ष), पोलीस हवालदार रामेश्वर जाधव (सदर बाजार), संजय मगरे (शहर वाहतूक शाखा), रुस्तुम जैवाळ (गुन्हे शाखा), राजेश निकाळजे, समाधान तेलंग्रे (आर्थिक गुन्हे शाखा), वाहन चालक मनीष ढेरे, पोलीस नाईक हरूनखा पठाण यांचा सन्मान चिन्ह जाहीर झालेल्यामध्ये समावेश आहे. या सर्वांचा महाराष्ट्र दिनी रोजी पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

## थोडक्यात

### पोलीस अधीक्षक बन्सल यांची सायबर सुरक्षा पदावर बदली

जालना। प्रतिनिधी



महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने आज राज्यातील २१ आयपीएस अधिका-यांच्या बदल्यांचे आदेश निर्गमित केले असून यामध्ये जालना जिल्ह्याचे कर्तदक्ष पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांची महाराष्ट्र राज्य सायबर सुरक्षा विभागाचे पोलीस अधीक्षक या ठिकाणी बदली झाली आहे. श्री अजय कुमार बंसल यांच्या कालखंडात सर्वात जास्त चोरीचे गुन्हे उघडतील करण्यात आले होते. आता जालन्याचे नवीन पोलीस अधीक्षक तेगबिरसिंह संधू हे येणार आहे तर जालन्याचे अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांची बदली चंद्रपूर येथे पोलीस अधीक्षक या पदावर झाली आहे. पोलीस अधीक्षक म्हणुन सध्या मालेगाव येथे अप्पर पोलीस अधीक्षक म्हणुन कार्यरत असलेले तेगबिरसिंह संधू यांची पोलीस अधीक्षक जालना येथे नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच जिल्ह्याचे अप्पर पोलीस अधीक्षक म्हणुन कार्यरत असलेले श्री. आयुष नोपाणी हे आता चंद्रपूरचे पोलीस अधीक्षक म्हणुन काम पाहणार आहेत. शासनाचे सहसचिव श्री. सुग्रीव धपाटे यांनी या संदर्भातील आदेश आज निर्गमित केले.


### जयेश जाधव याची निवड

पाथर्डी। प्रतिनिधी



पाथर्डी तालुक्यातील मालेवाडी गावातील युवक पै.जयेश जाधव याची कुस्ती या खेळात महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा युवा संचलनालय मिशन लक्षवेध या योजनेत निवड झाली आहे या योजनेची वैशिष्ट्ये ऑलम्पिक एशियन राष्ट्रकुल कॉमनवेल्थ अशा आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करण्याच्या उद्देशाने निवड चाचणी घेण्यात आल्या होत्या यात जयेश जाधव याची निवड झाली आहे जयेश जाधव याने यापूर्वीही तालुका जिल्हा विभागीय स्तरावर कुस्ती स्पर्धेत प्राविण्य मिळवले आहे यापुढील काळात महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र केसरी हिंद केसरी तसेच ऑलम्पिक एशियन आणि राष्ट्रीय व कॉमनवेल्थ या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पै.जयेश जाधव याने पाथर्डी तालुक्यासह मालेवाडी गावचे नाव राष्ट्रीय स्तरावर झळकावे अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे जयेश जाधव याच्या निवडीबद्दल भगवानगड परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

### पाथर्डी वनपरिक्षेत्र अधिकारी म्हणून मिलिंद गोवेकर नियुक्त



पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी वनपरिक्षेत्र कार्यालयातील माजी अधिकारी अरुण साबळे हे निवृत्त झाल्यानंतर वनपरिक्षेत्र अधिकारी म्हणून नव्याने मिलिंद गोवेकर हे नियुक्त झाले आहेत मूळचे फलटण येथील रहिवासी असलेले मिलिंद गोवेकर यांनी कोल्हापूर येथे प्रशिक्षणार्थी अधिकारी म्हणून काम पाहिले आहे पाथर्डी येथे वनपरिक्षेत्र अधिकारी म्हणून या पुढील काळात ते काम पाहणार आहेत पाथर्डी तालुक्यातील बेकायदेशीर वृक्षतोड थांबवणे तसेच वनसंवर्धन वन्यजीवांचे संवर्धन व संगोपन करणे शासनाच्या हरित जंगलांचे आगीपासून संरक्षण करणे महाराष्ट्र शासनाच्या वनविभागाच्या झाडे लावा झाडे जगवा या उद्दिष्टाचे पालन करून वनविभागाच्या जागेत मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करणे वन गुन्ह्यांचा तपास करणे आरोपींना अटक करणे व मुद्देमाल हस्तगत करणे तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी म्हणून ग्रीन सोल्जर दबंग कामगिरी करण्याचे आव्हान नवीन रुजू झालेले मिलिंद गोवेकर यांच्यावर असणार आहे.

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-१२**
**दिनांक - ०१/०४/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय
अर्जदार श्रीमान/श्रीमती अजिमखाँ निजामखाँ पठाण रा. नागझरी ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अफीफा अजिमखॉ पठाण | मुलगी | २९/११/२०१२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-११**
**दिनांक - ०१/०४/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय
अर्जदार श्रीमान/श्रीमती अजिमखाँ निजामखाँ पठाण रा. नागझरी ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मोहमदअनसखॉ अजिमखॉ पठाण | मुलगा | २०/०८/२००८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक- ०१/०४/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-१७**
**दिनांक - ०६/०४/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय
अर्जदार श्रीमान/श्रीमती निसारखाँ निजामखाँ पठाण रा. नागझरी ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अब्दुलरहेमानखॉ निसारखॉ पठाण | मुलगा | ०१/०१/२०१२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# ना.पंकजाताई मुंडे यांचा परळीत प्रभावी जनता दरबार

## परळी, बीडसह जिल्ह्यातील नागरिकांच्या समस्यांचा जागेवर निपटारा

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळीसह बीड जिल्ह्यातील नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करता यावे, त्यांचे जीवन कष्टमुक्त व्हावे या उदात्त हेतूने ना. पंकजाताई मुंडे या त्यांच्या प्रत्येक दौऱ्यात ‘जनता दरबाराचे आयोजन करतात. नेहमी प्रमाणे आजही त्यांचा भव्य जनता दरबार संपन्न झाला. यावेळी जिल्हाभरातून आलेल्या नागरिकांशी त्यांनी संवाद साधला. नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्यांचे निराकरण करण्यासाठी तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देऊन नागरिकांचे प्रश्न सोडविले.


छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील शासकीय विश्रामगृहात ना. पंकजाताई मुंडे यांचा जनता दरबार पार पडला. यात बीड जिल्ह्यातील आणि परळी तालुक्यातील असंख्य नागरिकांनी त्यांच्या समस्या व गाऱ्हाणी मांडल्या. ना. पंकजाताई मुंडे यांनी तत्परतेने



प्रत्येक विषयात लक्ष देऊन संबंधित शासकीय, निमशासकीय विभागांना बोलून नागरिकांचे प्रश्न मार्गी लावण्याचे निर्देश दिले.

### अलोट गर्दीत प्रभावी जनता दरबार

ना. पंकजाताई मुंडे यांचा जनता दरबार म्हणजे समस्या मार्गी लागण्याची हमी असते. प्रशासकीय कामांसह नागरिकांचे व्यक्तिगत सुख, दुःखाचे विषय देखील पंकजाताईंच्या माध्यमातून मार्गी लागतात. शासकीय विश्रामगृहाच्या भरगच्च सभागृहातील अलोट गर्दी याची साक्ष देत होती. प्रत्येकाशी आपुलकीने संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेत तात्काळ संबंधिताना संपर्क करून कामे मार्गी लावण्याच्या सूचना देऊन जागेवर त्यांनी समस्यांचा निपटारा केला. त्यांचा हा प्रभावी जनता दरबार सर्वसामान्यांचे जीवन कष्टमुक्त करण्याची अभिनव संकल्पना असल्याची भावना यावेळी नागरिक व्यक्त करत होते.



**बीड : पौर्णिमेच्या शुभ मुहूर्तावर नारायण गड (धाकटी पंढरी).येथे नगदनारायण महाराज. व. ह भ प.शिवाजी महाराज यांचे आशीर्वाद घेतले यावेळी अशोक अण्णा रोमन.**

# तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनच्या नूतन इमारतीसह तुलसी क्रिएशन शोरूमचे आज उद्घाटन

## विद्यार्थी व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे : प्राचार्या डॉ.अश्विनी बेद्रे यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीडच्या वतीने विद्यार्थिनींच्या कौशल्याला हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देणाऱ्या ‘तुलसी क्रिएशन द कम्प्लीट वुमन्स ड्रीम वर्ल्ड’ शोरूम तसेच महाविद्यालयाच्या नूतन इमारतीचा भव्य उद्घाटन सोहळा रविवार, दि. ३ मे रोजी सकाळी १०:३० वाजता संत ज्ञानेश्वर नगर, शासकीय आय.टी.आय. मागे, बीड येथे आयोजित करण्यात आला आहे.

हा सोहळा पूज्यनीय भिक्खू संघाच्या मंगल मैत्रीत संपन्न होणार असून, पूज्य भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो, पूज्य भदंत करुणानंद



महाथेरो आणि पूज्य भदंत धम्मशील थेरो यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. सोहळ्याचे उद्घाटन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबईचे प्रधान सचिव मा.डॉ. हर्षदीप कांबळे आणि समाज कल्याण विभाग, पुणे यांच्या आयुक्त मा. दीपा मुधोळ-मुंडे यांच्या शुभहस्ते होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुलसी शैक्षणिक समूहाचे संस्थापक अध्यक्ष मा.प्रा. प्रदिप रोडे हे असणार आहेत.

याशिवाय, विविध क्षेत्रांतील प्रशासकीय अधिकारी, शिक्षण, उद्योग क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते तसेच अनेक प्रतिष्ठित व्यक्तींची ◀◀ पान ३ वर

# शासकीय हमीभाव खरेदी केंद्रांवर हरभरा खरेदीस १५ मे पर्यंत मुदतवाढ द्यावी

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

केंद्र व राज्य सरकारने शासनामार्फत महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशन - नाफेड द्वारा शासकीय दराने सुरू केलेली चना (हरभरा) खरेदी २९ एप्रिल पर्यंत सुरू ठेवण्याचे निर्देश होते मात्र सदर हमीभाव खरेदी पोर्टल २४ एप्रिल रोजीच बंद करण्यात आले असून शासकीय हमीभाव चना खरेदी केंद्रावर खरेदीसाठी १५ मे पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी, अशी विनंती माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी लेखी पत्राद्वारे पणन मंत्री ना. जयकुमार रावल यांना केली आहे.



नाफेड द्वारा शासकीय हमीभाव खरेदी केंद्रांवर प्रति क्विंटल ५,८७५ रुपये प्रमाणे चना खरेदी करण्यात येत होता. यासाठी पणन विभागाने पोर्टलवर नोंद करण्यासाठी २९ एप्रिल पर्यंत मुदत दिली होती. मात्र २४ एप्रिल रोजीच हमीभाव खरेदी करिता नोंदणी करण्याचे पोर्टल बंद करण्यात आल्याने शेतकऱ्यांनी नोंदी करूनही हजारो क्विंटल चना (हरभरा) शिल्लक असल्याने संबंधित शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यामुळे शासनाचे याची तात्काळ दखल घेऊन चना खरेदीस १५ मे पर्यंत मुदतवाढ देण्याची लेखी पत्राद्वारे मागणी धनंजय मुंडे यांनी केली असून, पणन विभाग सकारात्मक निर्णय घेईल, अशी अपेक्षा हरभरा उत्पादक शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

# पाटोदा घरफोडीचा छडा; स्थानिक गुन्हे शाखेने आरोपीला ठोकल्या बेड्या



बीड । प्रतिनिधी

पाटोदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या घरफोडीचा छडा लावण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. या प्रकरणी एका आरोपीला अटक करून त्याच्याकडून चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

शिरूर तालुक्यातील हाटकरवाडी येथील रहिवासी रामभाऊ विठ्ठल पुरणे हे २४ जानेवारी २०२६ रोजी आपल्या घरासमोर झोपलेले असताना, अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घरात शिरून सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली होती. याप्रकरणी पाटोदा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक या गुन्ह्याचा समांतर तपास करत असताना त्यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, यश काग्रेस चव्हाण याने ही चोरी केली असून तो सध्या आपल्या घरी आला आहे. मिळालेल्या ◀◀ पान ३ वर

## माणुसकीचा विजय: हिंदू बांधवांनी मुस्लिम व्यक्तीला दिले नवजीवन

# फाशीच्या दारातून परत आणला जीव माजलगावमध्ये मानवतेचा जिवंत नमुना

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील सावरगाव शिवारात दि ०१ मे शुक्रवार रोजी माणुसकीचा जिवंत आणि प्रेरणादायी नमुना पाहायला मिळाला. माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोसीन महेबूब शेख (वय ४७, रा.आझाद नगर,कुंभारी पिंपळगाव, जि. जालना) यांनी लिंबाच्या झाडाला फाशी घेण्याचा प्रयत्न केला होता.

ही बाब लक्षात येताच सावरगाव येथील परमेश्वर



चाव्हरे,आकाश जगताप आणि रवी कुव्हारे यांनी क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेतली.त्यांनी तात्काळ फाशी सोडवून त्या व्यक्तीला खाली उतरवले आणि त्याचा जीव वाचवला. यानंतर पत्रकार सय्यद आलिम यांनी घटनास्थळी पोहोचत त्वरित सि. पी.आर.देऊन त्या व्यक्तीची प्रकृती स्थिर करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या तत्परतेमुळे संबंधित व्यक्तीला पुन्हा शुद्ध आली. विशेष म्हणजे, जीवदान मिळालेला व्यक्ती मुस्लिम समाजातील असून त्याला मदत करणारे सर्व हिंदू बांधव होते. या घटनेतून धर्मापेक्षा माणुसकीच मोठी असल्याचा संदेश पुन्हा एकदा अधोरेखित ◀◀ पान ३ वर

# महानुभाव पंथाची समता व सर्व समावेशकता समाजासाठी प्रेरणादायी - आ.सुरेश धस

पाटोदा । प्रतिनिधी

दिनांक १/५/२०२६ शुक्रवार रोजी पाटोदा महानुभाव पंथाचे संस्थापक सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांच्या पावन वास्तव्याने धन्य झालेल्या श्रीकृष्ण मंदिर महादेव मंदिर परिसरात उभारण्यात आलेल्या भक्तनिवास वास्तूच्या लोकार्पण सोहळ्यास उपस्थित राहिलो.

सन २०१९-२० मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व पर्यटन मंत्री जयकुमार रावल यांच्या मार्गदर्शनाखाली



पर्यटन विभागाच्या विशेष योजनेतून मंजूर २ कोटी ५१ लक्ष रुपये निधीतून सुसज्ज हॉल,निवासी खोल्या,टॉयलेट-बाथरुम सुविधा,संरक्षण भिंत, पाणी फिल्टर आदी सुविधा उभारण्यात आल्या आहेत. नानानासाहेब डीडुळ,सतीश बप्पा जाधव व सहकाऱ्यांनी अत्यंत गुणवत्तापूर्ण काम करून पाटोद्यात एक सुंदर वास्तू साकारली आहे.

या प्रसंगी महानुभाव पंथाची समता, साधेपणा व सर्वसमावेशकता अधोरेखित करत,सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांनी १२ व्या शतकात मराठीतील ‘लीळाचरित्र’च्या माध्यमातून दिलेला सामाजिक संदेश आजही प्रेरणादायी असल्याचे नमूद केले. पाटोदा हे त्यांच्या वास्तव्याने पवित्र स्थळ असून या ठिकाणाचा विकास ◀◀ पान ३ वर



**मौलानी बाबा यात्रा उत्सवात जंगी कुस्ती हगामा २१ हजाराची कुस्ती लावताना कडा बाजार समिती सदस्य परीवंत गायकवाड,रमजाभाई तांबोळी सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती कडा , सरपंच युवराज पाटील, उपसरपंच दीपक कर्डिले, रामशेठ मधुकर, यशवंत खंडागळे, बाळासाहेब कर्डिले,बबलु पानसरे, अनिल ढोबळे (छाया शरद रेडेकर)**

# ग्रामीण भागातील शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणारे कृषी प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी लाभदायक -विजयसिंह पंडीत

## बीड येथील राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे विविध मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन संपन्न

बीड । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आधुनिक व नाविन्यपूर्ण कृषी तंत्रज्ञानाची माहिती मिळावी, त्यांच्या शेतीत उत्पादन वाढावे आणि आर्थिक उन्नती साधता यावी या उद्देशाने महेश बेदरे यांनी सुरू केलेले कृषी प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी अत्यंत लाभदायक ठरणार आहे, असे प्रतिपादन गेवराई ची लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांनी केले यांनी केले.

ते बीड येथे आयोजित



राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर नगर उपाध्यक्ष विनोद मुळक , सभापती निजामभाई , शिवसेनेचे गणेश उगले , स्वागत अध्यक्ष दिलीपराव गोरे , कार्याध्यक्ष शिवराम घोडके, कैलास रकटे , बंडू जटाळ , युवा नेते राजेंद्र मोटे, गणेश राऊत , मुख्य संयोजक महेश बेदरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार म्हणाले की, आज अनेक परदेशांमध्ये शेती तंत्रज्ञान प्रचंड वेगाने विकसित झाले असून आधुनिक यंत्रणा, डिजिटल प्रणाली व संशोधनाच्या आधारे त्यांनी शेती क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. मात्र कृषीप्रधान देश असलेला भारत या बाबतीत काही प्रमाणात मागे राहिला आहे. अशा परिस्थितीत महेश बेदरे यांनी ग्रामीण शेतकऱ्यांसाठी उभारलेले हे कृषी प्रदर्शन आणि कृषिरथ हे शेती क्षेत्राला नवी दिशा देणारे असून शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी मोलाचे ठरणार आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

गेवराई ◀◀ पान ३ वर

# गेवराईत विजेचा लपंडाव

## महावितरणच्या कारभारावर माजी नगरसेवक सय्यद एजाज आक्रमक प्रशासनाने तातडीने लक्ष न दिल्यास कार्यालयावर धडक देण्याचा इशारा



गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरात सध्या सूर्याचा पारा चाळीशी पार गेल्याने नागरिक उन्हाच्या झळांनी होरपळून निघत आहेत. अशा भीषण उन्हाळ्यात महावितरणच्या गलथान कारभारामुळे शहरात विजेचा मोठा लपंडाव सुरू असून, यामुळे सर्वसामान्य नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. या गंभीर प्रश्नावर माजी नगरसेवक सय्यद एजाज यांनी महावितरणच्या कारभाराचा तीव्र निषेध व्यक्त केला असून प्रशासनाला इशारा दिला आहे.विनाकारण वीज खंडित, नागरिक त्रस्तशहरात सध्या अधिकृत लोडशेडिंग नसतानाही तासनतास वीज खंडित केली जात आहे. कडक उन्हाच्या वेळी कोणतीही पूर्वसूचना न देता वीज गायब होत असल्याने लहान मुले, वृद्ध आणि आजारी व्यक्तींचे हाल होत आहेत. जर लोडशेडिंग नाही, तर मग वारंवार वीज जाते कुठे? असा संतप्त सवाल सय्यद एजाज यांनी उपस्थित केला आहे.मध्यरात्रीही झोपमोडकेवळ दिवसाच नव्हे, तर रात्री २ ते २:३० वाजेच्या सुमारास वीज खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. यामुळे नागरिकांची झोपमोड होत असून दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. भर उन्हाळ्यात रात्रीच्या वेळी वीज गेल्याने अस्वस्थता वाढली असून नागरिकांमध्ये संतापाची लाट आहे.संपर्क यंत्रणा कोलमडलीनागरिकांनी तक्रार करण्यासाठी महावितरणच्या सबस्टेशनला फोन केल्यास, फोन 'नॉट रिचेबल' लागतो किंवा मुद्दाम 'बिझी' ठेवला जातो, असा आरोप सय्यद एजाज यांनी केला आहे. तक्रार निवारण यंत्रणाच निष्क्रिय झाल्याने ◀◀ पान ३ वर

# जिल्हास्तरीय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्काराने सुनीता नरंगलकर यांचा पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते गौरव

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

सामाजिक क्षेत्रात गेल्या १५ वर्षांपासून सातत्याने कार्यरत असलेल्या श्रीमती सुनीता श्रीपतराव नरंगलकर यांना जिल्हास्तरीय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती सुनेत्रा अजितदादा पवार यांच्या हस्ते त्यांना सन्मानपत्र व रुपये १०,००१ रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले.

श्रीमती नरंगलकर यांनी



अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता अभियान तसेच कौटुंबिक समुपदेशन या क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केले आहे. कौटुंबिक सल्ला केंद्राच्या माध्यमातून त्यांनी अनेक कुटुंबांतील तणाव कमी करून नातेसंबंध दृढ करण्यासाठी मोलाचे योगदान दिले आहे.

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत त्यांनी एकूण १७१ प्रकरणांवर समुपदेशन केले असून त्यापैकी १३४ प्रकरणे निकाली काढण्यात यश मिळवले आहे, तर ३१ प्रकरणे पोलिसांकडून संदर्भित करण्यात आली होती.

तसेच कोविड काळात जिल्हा प्रशासनाच्या समन्वयाने जनजागृती, स्वच्छता व आरोग्य मार्गदर्शन केले. बालविवाह प्रतिबंध, बालमजुरी निर्मूलन आणि गरजू महिला व मुलांच्या पुनर्वसनासाठीही त्यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. त्यांच्या या समाजोपयोगी कार्याची दखल घेऊन प्रदान करण्यात आलेला हा पुरस्कार त्यांच्या कार्याची पावती ठरत असून, विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# आमची सुरक्षा करता येत नसेल तर लाडकी बहीण योजनेचे पैसे देऊन काय उपयोग; चिमुरडीच्या मृत्यूनंतर भोरमधील महिला संतापल्या

**पुणे । प्रतिनिधी**

आमची सुरक्षितता सरकार बाळगत नसेल तर लाडकी बहीण देऊन उपयोग काय? असा संतप्त प्रश्न नसरापूर गावातल्या महिलांनी उपस्थित केला आहे. ज्या चिमुकलीसोबत हे अमानवी, राक्षसी कृत्य केलं तिला आम्ही खेळताना, बागडताना बघितलं आहे. त्या नराधमाला आमच्या समोर आणा, त्याला फाशिचीच शिक्षा द्या, अशी आग्रही मागणीही पुण्यातील भोर तालुक्यातील नसरापूर गावातल्या महिलांनी केली आहे.



आम्ही त्या चिमुरडी खेळताना, बागडताना बघितलं

पुण्यातील भोर परिसरात एका चार वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करुन तिची निर्घृण हत्या करण्याचा अमानवी आणि संतापजनक घटना उजेडात आली आहे. यातील मृत अल्पवयीन मुलगी नसरापूरला तिच्या आजीकडे उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी आली होती. त्यावेळी एका नराधमाने तिला जवळच असलेल्या गुरांच्या गोठ्यात नेऊन तिच्यावर अमानुषपणे अत्याचार (ड्र्शीरिश्र -ीर्रीश्रीं) केला, आणि त्यानंतर तिची हत्या करण्यात आली. या घटनेनंतर गावकऱ्यांनी संशयित व्यक्तीला पकडले असून पोलिसांनी (झीपिश झेश्रळलश) त्याला ताब्यात घेतले आहे. मात्र, या व्यक्तीने आपण मुलीवर अत्याचार केल्याची बाब नाकारली आहे. दरम्यान, या घटनेनंतर शुक्रवार रात्री नसरापूर येथील वातावरण तापले होते. (झीपिश ऋळीश्र चींवशी उरीश) एकंदरीत या प्रकरणाने राज्यात खळबळ उडाली असून संतप्त प्रतिक्रिया उमटू लागली आहे.

नसरापूर ग्रामस्थांचा संताप, गावात कडकडीत बंद

भोर तालुक्यातील नसरापूर गावात साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली आणि त्यानंतर आज गावात कडकडीत बंद पुकारण्यात आला आहे. ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे आणि सोबतच या नराधनाला फाशीची शिक्षा द्या, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. असे नसेल होत तर तर त्या नराधमाला आमच्या हाती द्या, आम्ही त्यांचं काय करायचं ते बघू, असं म्हणत ग्रामस्थांनी घटनेवर संताप व्यक्त केला आहे.

वासरू दाखवतो म्हणून हात धरून चिमुकलीला गोठ्यात नेलं

नराधम आरोपीने वासरू दाखवतो म्हणून हात धरून चिमुकलीला गोठ्यात नेलं आणि तिच्यावर अत्याचार केला. आजीकडे उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी आलेल्या या मुलीच्या कुटुंबीयांनी आपल्याच मुली सोबत असं कधी घडेल असा विचारही केला नव्हता मात्र साडेतीन वाजताच ते सीसीटीव्ही फुटेज समोर आलं आणि अख्ख कुटुंब हादरलं. या घटनेनंतर गावकऱ्यांनी संताप व्यक्त करत पोलिसांना घेराव घातली, रात्री उशीरापर्यंत पोलिसांनी गावकऱ्यांची समजूत काढली, त्यानंतर गावकऱ्यांनी मोर्चा मागे घेतला, पण आज या अत्याचाराचा विरोधात ग्रामस्थांचा मोर्चा सुरू झाला आहे. गावातील भैरवनाथ मंदिराजवळ हा मोर्चा सुरू झाला.

# सुनेत्रा पवार नसरापुरात, पीडित मुलीच्या घरातून मुख्यमंत्र्यांना फोन, आरोपीला कठोर शिक्षा देण्याचं आश्वासन

**पुणे । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी नसरापूरमध्ये हत्या झालेल्या मुलीच्या पुण्यातील घरी सांत्वन पर भेट दिली. यावेळी या मुलीचे कुटुंबीय आणि आजुबाजूच्या लोकांनी सुनेत्रा पवार यांच्याकडे आरोपीच्या विरोधात लवकरात लवकर खटला चालवून त्याला शिक्षा करण्याची मागणी केली. त्यानंतर सुनेत्रा पवार यांनी जमावाच्या समोर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फोन लावला आणि जमावाच्या भावना मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहचवल्या. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून आरोपीला लवकरात लवकर आणि कठोरात कठोर शिक्षा देण्याचं आश्वासन दिलंय.

पुण्यातील नसरापूरमध्ये ४ वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार करून हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी पुणे ग्रामीण पोलिसांनी आरोपीला कोर्टात हजर केलं. यावेळी नराधम आरोपीला ७ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.




पुणे लैंगिक आणि हत्या प्रकरणाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी गंभीर दखल घेतली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षकांना कठोर कारवाईचे निर्देश दिले आहेत. तसंच अत्याचाराचं प्रकरण फास्टट्रॅकवर चालवणार असल्याचं फडणवीसांनी सांगितलं.

नेमकं काय घडलं?

पुण्यातील नसरापूर येथे १ मे रोजी एक धक्कादायक घटना घडली. एका ६५ वर्षीय व्यक्तीने, घरासमोर खेळणाऱ्या चिमुकलीला गोठ्यात नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. नंतर दगडाने ठेचून तिला निर्घृणपणे संपवलं आणि नंतर तिचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली झाकून ठेवला. दुपारी चिमुकली न दिसल्यानं तीची शोधाशोध केल्यानंतर चिमुकली गोठ्यात मृत अवस्थेत आढळली. त्यानंतर परिसरातले सीसीटीव्ही फुटेज चेक केल्यानंतर आरोपी चिमुकलीला गोठ्याच्या दिशेने घेऊन जाताना दिसला. त्यानंतर हा प्रकार उघडकीस आला.

नराधम आरोपीने वासरू दाखवतो म्हणून हात धरून त्या चिमुकलीला गोठ्यात नेलं आणि तिच्यावर अत्याचार केला. आजीकडे उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी आलेल्या या मुलीच्या कुटुंबीयांनी आपल्याच मुली सोबत असं कधी घडेल असा विचारही केला नव्हता. मात्र दुपारी साडेतीन वाजताचे ते सीसीटीव्ही फुटेज समोर आलं आणि अख्खं कुटुंब हादरलं. या घटनेनंतर गावकऱ्यांनी संताप व्यक्त करत पोलिसांना घेराव घातला. दरम्यान, या प्रकरणातील नराधमाला ७ मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# तरुणाला बेदम मारहाण; ६ जणांवर गुन्हा दाखल

**सासवड । प्रतिनिधी**

ऑर्केस्ट्रा कार्यक्रमातील किरकोळ वादाच्या कारणावरून पुरंदर तालुक्यातील तक्रारवाडी येथील एका तरुणाला सासवड येथे बेदम मारहाण करण्यात आली. ही घटना गुरुवारी (दि. ३०) सकाळी घडली. या प्रकरणी सासवड पोलिसांनी सहा जणांवर गुन्हा दाखल केला आहे.



आदित्य सुरेश खेंगरे (वय १९, रा. तक्रारवाडी, ता. पुरंदर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, शुभम जगताप व अमर जगताप (दोघे रा. बेलसर, ता. पुरंदर), तसेच इतर तीन ते चार अनोळखी इसमांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी (दि. २९) रात्री तक्रारवाडी येथे झालेल्या ऑर्केस्ट्रा कार्यक्रमादरम्यान बेलसर येथील काही युवक गोंधळ घालत असल्याने त्यांना आवर घालण्याच्या प्रयत्नात किरकोळ वाद झाला होता. त्याचाच राग मनात धरून आरोपींनी दुसऱ्या दिवशी गुरुवारी आदित्यला मारहाण केली.

आदित्य हा त्याचे काका नवनाथ खेंगरे यांच्यासह सासवड येथील नाचन किराणा स्टोअरमध्ये आला होता. या वेळी एक अनोळखी युवक त्याच्याकडे आला व मागील वादाचा जाब विचारत शिवीगाळ करू लागला. काही वेळांतच शुभम जगताप व अमर जगताप (दोघे रा. बेलसर, ता. पुरंदर) तसेच इतर तीन ते चार अनोळखी इसम तेथे येऊन आदित्यला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यापैकी एका आरोपीने कंबरेचा बेल्ट काढून पाठीवर व मानेवर मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

काही वेळांतच शुभम जगताप व अमर जगताप (दोघे रा. बेलसर, ता. पुरंदर) तसेच इतर तीन ते चार अनोळखी इसम तेथे येऊन आदित्यला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यापैकी एका आरोपीने कंबरेचा बेल्ट काढून पाठीवर व मानेवर मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

# जुन्नर तालुक्यात तीव्र पाणीटंचाई! १२ गावांमध्ये टँकर सुरू; ८ गावांना मंजुरी

**नारायणगाव । प्रतिनिधी**

यंदाचा उन्हाळा अत्यंत तप्त असल्यामुळे जुन्नर तालुक्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई गंभीर बनू लागली आहे. या पार्श्वभूमीवर तालुक्यातील १२ गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करण्यात आले असून, आणखी ८ गावांना टँकर सुरू करण्यासाठी प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे, अशी माहिती जुन्नर पंचायत समितीच्या सभापती कमल शेळकंदे यांनी दिली.

सभापती शेळकंदे यांनी सांगितले की, यंदा तापमानात मोठी वाढ झाल्यामुळे विशेषतः तालुक्याच्या पश्चिम भागातील वाड्या-वस्त्यांमध्ये तसेच उत्तर विभागातील कोपरे-मांडवे परिसरात पाणीटंचाई तीव झाली आहे. त्यामुळे नागरिकांना दिलासा देण्यासाठी तातडीने टँकर सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. यंदा उन्हाळा भीषण असल्याने जुन्नर पंचायत समितीचा पाणीपुरवठा विभाग तालुक्यातील प्रत्येक गावे व वाड्यांशी सतत संपर्कात आहे.

गोद्रे, कोपरे, मांडवे, अजनाळे, सुकाळवेढे, निमगिरी, हडसर, पेठेचीवाडी, कोटमवाडी, गुळुंचवाडी, शिंदेवाडी आणि नळावणे या १२ गावांमध्ये लोकसंख्येनुसार



पाण्याचे टँकर सुरू करण्यात आले असून, आवश्यकतेनुसार त्यांच्या फेऱ्यांमध्ये वाढ करण्यात येत आहे.

तसेच तळेरान, आंबे, तांबे, हातवीज, शितेवाडी, देवळे, बांगरवाडी, खैरे आणि खटकाळे या गावांना टँकर सुरू करण्यास मंजुरी मिळाली असून, तेथेही लवकरच पाणीपुरवठा सुरू केला जाणार आहे. चावंड वडगाव आनंद या गावचा पाण्याचा टँकर सुरू करण्याचा प्रस्ताव आला असून, तातडीने प्रशासकीय मंजुरी घेऊन तेथे देखील केला जाईल, असे शेळकंदे यांनी सांगितले. दरवर्षीप्रमाणे यंदाही जुन्नर तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यात उन्हाळ्यात पाण्याची समस्या उद्भवली आहे. यावर उपाय म्हणून पंचायत समितीमार्फत परिस्थितीचा आढावा घेऊन टँकरची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच ज्या ठिकाणी हापसे (हातपंप) नादुरुस्त आहेत, त्यांची तत्काळ दुरुस्ती करण्याच्या सूचना पाणीपुरवठा विभागाला देण्यात आल्या आहेत. ज्या गावांमध्ये किंवा वाड्या-वस्त्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची कमतरता भासेल, त्यांनी तातडीने प्रस्ताव सादर करावा. तेथे प्रशासनाची मंजुरी मिळताच त्वरित टँकर सुरू करण्यात येतील, असेही शेळकंदे यांनी स्पष्ट केले.

# प्रेम प्रकरणातून तरुणीवर प्राणघातक हल्ला; पठारेवस्ती चंदनगर परिसरातील घटना

**पूणे । प्रतिनिधी**

प्रेमप्रकरणातून प्रेयसीचा ब्लेडने गळा चिरून तिला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. उजालादेवी जसवंतसिंग दोहरे (वय.२२,रा.चंदनगर, मुळ. उत्तरप्रदेश) असे जखमी झालेल्या तरुणीचे नाव आहे. तिची प्रकृती चिंताजनक असून, तिच्यावर खासगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी, पोलिसांनी दिलीप राठोड (वय.२२) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला (झीपिश छशुी) आहे. ही घटना बुधवारी (दि.२९) रात्री साडे आठ वाजताच्या सुमारास पठारेवस्ती चंदनगर परिसरात घडली. याबाबत तरुणीचा भाऊ भगतसिंग जसवंतसिंग दोहरे (वय.२५) याने फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी दिपील राठोड आणि जखमी तरुणी उजालादेवी हे एका मॉलमध्ये एकत्र काम करत होते. तेथे दोघात प्रेमसंबंध निर्माण झाले. मात्र गेल्या काही दिवसापासून त्यांच्यात वाद होते. त्याच कारणातून बुधवारी रात्री दिलीप हा तरुणी राहत असलेल्या पठारेवस्ती चंदननगर येथे आला.

त्याने घरात घुसून तरुणीच्या गळ्यावर ब्लेडने वार केले.तरुणीवर हल्ला केला तेव्ही ती एकटीच घरी होती. तिचा भाऊ आणि भावाची बायको बाहेर कामावर गेले होते. त्यानंतर तो पसार झाला. तरुणीने फोन करून आपल्या भावाला ही माहिती दिली. तु लवकर घरी ये मला एका मुलाने मारले आहे. खूप लागले आहे.माझ्या गळ्यातून आवाज येत नाही. त्यानंतर तरुणीने (झीपिश छशुी) आपल्या भावालाच व्हिडीओ कॉल केला. त्यावेळी तरुणी भावाला रक्तबंबाळ अवस्थेत दिसली. भावाने घराकडे धाव घेतली. तोपर्यंत तेथील काही नागरिक आणि तरुणीचे नातेवाईक जमा झाले होते. त्यांनी तिला रुग्णालयात दाखल केले. पोलिसांना घटनेची माहिती मिळताच त्यांनी रुग्णालयात धाव घेतली. तरुणीला तिला कोणी मारले असे विचारले तेव्हा तिला बोलता येत नव्हते. तिने इशारा करून पेन आणि कागद मागितला. त्यावर तिने दिलीप राठोड असे लिहले. घरात घुसून तरुणीवर ब्लेडने वार करण्यात आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. अद्याप आरोपी दिपील राठोड फरार असून, पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

## रंजना केसकर यांच्या मृत्यूची जबाबदारी मुख्यमंत्री घेणार का? ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांचा सवाल

**केडगाव । प्रतिनिधी**

दौंड तालुक्यातील खोरमधील रंजना केसकर या महिलेचा कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया दरम्यान अति रक्तस्राव होऊन मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना शनिवारी (दि. २५ एप्रिल) घडली असून या घटनेमुळे आरोग्य विभागाचा निष्काळजीपणा उघड झाला आहे.

या पार्श्वभूमीवर ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी शुक्रवारी खोर गावात केसकर कुटुंब यांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. यावेळी बोलताना



लक्ष्मण हाके यांनी या घटनेची जबाबदारी मुख्यमंत्री किंवा आरोग्य मंत्री घेणार का असा सवाल केला आहे. यावेळी बोलताना लक्ष्मण हाके म्हणाले, रंजना केसकर यांचा बळी या राज्यांच्या आरोग्य विभागाने घेतला असून पुणे जिल्ह्यातील नसबंदी शस्त्रक्रिया करण्यासाठी सातारा जिल्ह्यातील कदम नामक डॉक्टरला बोलवावे लागते आणि या शस्त्रक्रिया करण्यासाठी टार्गेट दिले जात असून या डॉक्टरने एका दिवसांत ९७ इतक्या विक्रमी शस्त्रक्रिया केल्या आहेत. मेंढपाळ असणाऱ्या रंजना केसकर यांच्या शस्त्रक्रियेवेळी केसकर यांच्या शरीरात रक्तस्राव होत आहे, हे माहीत असूनही केवळ टार्गेट पूर्ण करण्यासाठी डॉक्टर कदम यांनी शस्त्रक्रिया केली, असा आरोप लक्ष्मण हाके यांनी केला आहे. रंजना केसकर यांच्या कुटूंबियांना न्याय मिळवून देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले.

# पुण्यात 'एसीबी'ची सर्वात मोठी कारवाई; २८ लाखांची लाच घेताना महिला पोलीस अधिकारी जाळ्यात

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे पोलिस दलाच्या गोटातून एक अतिशय खळबळजनक बातमी समोर आली आहे. तक्रार अर्जाच्या चौकशी प्रकरणात तब्बल २८ लाख रुपयांची लाच घेताना पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेतील सहायक पोलीस निरीक्षक वैशाली तोटेवार यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहात पकडले.

ही कारवाई शनिवारी बंडगार्डन रस्ता परिसरातील एका तारांकित हॉटेलसमोर सापळा रचून करण्यात आली. या प्रकरणात एका खासगी व्यक्तीलाही ताब्यात घेण्यात आले असून, या घटनेमुळे पुणे पोलीस दलात खळबळ उडाली आहे. एसीबीच्या माहितीनुसार, वैशाली तोटेवार या आर्थिक गुन्हे शाखेत कार्यरत असताना त्यांच्या ताब्यात काही तक्रार अर्ज चौकशीसाठी देण्यात आले होते. त्यापैकी एका प्रकरणात त्यांनी तक्रारदाराकडे ३० लाख रुपयांची लाच मागितली होती. (झीपिश -लल छशुी)

तक्रारदाराने सुरुवातीला २ लाख रुपये दिल्यानंतर उर्वरित २८ लाखांची मागणी करण्यात आली. यानंतर तक्रारदाराने एसीबीकडे तक्रार दाखल केली. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर एसीबीने सापळा रचला. तोटेवार यांनी लाचेची रक्कम स्वीकारण्यासाठी एका खासगी व्यक्तीला पाठवले होते. सापळ्यात त्या व्यक्तीस २८ लाख रुपये घेताना पकडण्यात आले. त्यानंतर तोटेवार यांनाही ताब्यात घेण्यात आले. कारवाईनंतर एसीबी पथकाने तोटेवार यांच्या पुणे पोलीस आयुक्तालयातील कार्यालयासह त्यांच्या निवासस्थानी झडती सुरू केली आहे. या प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, गुन्हा नोंदवल्यानंतर अटकेची कारवाई केली जाणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. दरम्यान, तोटेवार यांची नुकतीच पदोन्नती होऊन त्यांची मुंबई लोहमार्ग पोलीस दलात पोलीस निरीक्षक म्हणून बदली झाली होती. शुक्रवारी त्यांना पुणे पोलीस दलातून कार्यमुक्त करण्यात आले होते. त्यांच्या विरोधातील या कारवाईमुळे पोलीस दलात मोठी खळबळ निर्माण झाली आहे.


# बारावी परीक्षेत पुणे विभागाचा ९३.३४ टक्के निकाल; राज्यात दुसऱ्या क्रमांकावर, पुन्हा एकदा मुलींचीच बाजी

**पुणे । प्रतिनिधी**

बारावी परीक्षेचा निकाल आज (२ मे) जाहीर करण्यात आला. राज्यात पुणे विभागाचा निकाल ९३.३४ टक्के लागला असून राज्यात दुसरा क्रमांक पटकावला आहे. बारावी निकालात पुन्हा एकदा कोकण विभागाने बाजी मारली आहे. विद्यार्थ्यांना ७ वेगवेगळ्या वेबसाईटवर आपला निकाल पाहता येणार आहे. यावर्षी राज्याचा एकूण निकाल ९१.८७ टक्के लागला आहे. गेल्या वर्षीच्या ९३.२९ च्या तुलनेत यात १.४२ टक्क्यांची घट झाली आहे.

राज्यात पुन्हा मुलींची सरशी

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मुलींनी बाजी मारली आहे. मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण ९४.७३ टक्के आहे, तर मुलांचे प्रमाण ८९.१४ टक्के आहे. मुली मुलांपेक्षा ५.५९ टक्क्यांनी जास्त उत्तीर्ण झाल्या आहेत. सर्व नऊ विभागीय मंडळांमध्ये कोकण विभाग ९७.५१ टक्के निकालासह प्रथम क्रमांकावर आहे. सर्वात कमी निकाल लातूर विभागाचा लागला आहे.



नऊ विभागीय मंडळाचा निकाल

पुणे ९१.२५
नागपूर ८८.६७
छत्रपती संभाजीनगर ८८.६८
कोल्हापूर ८९.९७
अमरावती ९०.९२
नाशिक ९०.७२
लातूर ८४.१४
कोकण ९४.१४
मुंबई ९०.०८

शाखानिहाय निकाल

विज्ञान शाखा: ९६.४४ टक्के
वाणिज्य शाखा: ९२.७१ टक्के
कला शाखा: ८६.४५ टक्के
व्यावसायिक अभ्यासक्रम (क्ष्ठउ तेलरींळेपरश्र): ८७.७५ टक्के

निकालाची ठळक वैशिष्ट्ये

१. डिजिटल क्रांती: यावर्षी प्रथमच गुणपत्रिका आणि प्रमाणपत्र निकाल लागल्यापासून १५ व्या दिवशी एकाच वेळी शाळांमध्ये उपलब्ध करून दिली जातील.

२. सुरक्षा उपाय: पेपर वाहतुकीसाठी ऋझड एनेबल डिजिटल लॉक सिस्टिमचा यशस्वी वापर करण्यात आला.

३. कॉपीमुक्त अभियान: कडक निर्बंधांमुळे यावर्षी निकालात काही प्रमाणात घट झाली आहे. परीक्षेदरम्यान १९८३ गैरप्रकार आढळले असून १०० कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

४. सवलतीचे गुण: खेळाडू, छउउ, स्काऊट आणि गाईड विद्यार्थ्यांना शासन निर्णयानुसार सवलतीचे गुण देण्यात आले आहेत.

५. पुरवणी परीक्षा: जे विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहेत त्यांच्यासाठी जून-जुलै २०२६ मध्ये पुरवणी परीक्षा घेतली जाईल.

या वेबसाईटवर दिसणार निकाल

दुपारी १ वाजता खालील अधिकृत वेबसाईटवर निकाल उपलब्ध होईल.

https://hscresult.mkcl.org/
https://hscresult.mahahsscboard.in/
https://mahresult.nic.in/

निकालासाठी काय लागेल?

१. विद्यार्थ्याचा सीट नंबर (डशरीं छीालशी)
२. आईचे नाव

निकाल कसा पाहायचा?

mahresult.nic.in, hscresult.mkcl.org, mahahsscboard.in यातील कोणत्याही एका अधिकृत वेबसाइटला भेट द्या.

'HSC Examination Result 2025' लिंकवर क्लिक करा.

तुमचा रोल नंबर (Roll Number/Seat Number) टाका.

तुमच्या आईचे पहिले नाव टाका.

'View Result' वर क्लिक करा.निकाल स्क्रीनवर दिसेल, त्याची प्रिंटआऊट किंवा स्क्रीनशॉट घ्या.